जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## महापालिका निवडणूकीच्या वादातून बांधकाम व्यावसायिकावर प्राणघातक हल्ला

नगर - महानगरपालिका निवडणुकीच्या जुन्या वादातून एका बांधकाम व्यावसायिकावर लोखंडी रॉड आणि लाकडी दांडक्याने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना तपोवन रोड परिसरात घडली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत सागर दत्तात्रय ढवण (वय ३८, रा. तपोवन रोड) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अजय उर्फ विकी दिलीप ढवण, ऋषीकेश सुनील ढवण, सागर पोपट पोळ, मयूर सुरेश मुळे आणि विजू बहीरु शिंदे (सर्व रा. ढवण वस्ती, अहिल्यानगर) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर ढवण यांचे इंडो आयरीश हॉस्पिटल शेजारी नवीन बांधकाम सुरू आहे. १४ एप्रिल रोजी सायंकाळी ढवण तिथे असताना सर्व आरोपी त्या ठिकाणी आले.

तुम्ही आम्हाला महानगरपालिका निवडणुकीत खूप त्रास दिला आहे, असे म्हणून आरोपींनी ढवण यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि आरोपींनी जवळ असलेल्या लोखंडी रॉड व लाकडी दांडक्याने ढवण यांना बेदम मारहाण केली. यावेळी विकी ढवण याने आपल्या गळ्यातील पंच्याने फिर्यादीचा गळा आवळून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात ढवण गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी पथकासह भेट दिली. सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्पना चव्हाण या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# ‘संपदा पतसंस्थे’च्या संचालकांच्या जप्त मालमत्तांची लिलाव प्रक्रिया सुरु

### ज्ञानदेव वाफारे, सुजाता वाफारेंच्या माळीवाडा व नेप्ती येथील मालमत्तांची विक्री

नगर - ठेवीदारांनी विश्वासाने ठेवलेल्या ठेवींच्या रकमांचा अपहार केल्या प्रकरणी नाशिक मध्यवर्ती कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या संपदा पतसंस्थेच्या संचालक मंडळाच्या शासनाने जप्त केलेल्या मालमत्तांच्या लिलावाद्वारे विक्रीची प्रक्रिया सुरु झाली असून चेअरमन ज्ञानदेव वाफारे यांच्या नावावर माळीवाडा येथे असलेला प्लॉट आणि त्याची पत्नी सुजाता वाफारे हिच्या नावावर असलेली नेप्ती (ता.नगर) येथील मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करण्यात आली आहे. अन्य दोन संचालकांच्या नालेगाव येथील मालमत्तांचा लिलाव ८ मे रोजी होणार आहे.

संपदा पतसंस्थेत शेकडो ठेवीदारांच्या ठेवी अडकून पडलेल्या आहेत. या ठेवी व्याजासह परत मिळाव्यात, या मागणीसाठी काही ठेवीदारांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंचाकडे दाद मागितली होती. यावर सुनावणी होऊन न्यायमंचाने संपदा पतसंस्थेचा तत्कालीन चेअरमन ज्ञानदेव सबाजी वाफारे याच्यासह सर्व संचालकांना दोषी धरून व्याजासह ठेवी परत करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत नगर तालुका तहसीलदार यांच्याकडे वसुलीसाठी (संपत्ती लिलाव) प्रकरण पाठविण्यात आले होते. या आदेशानुसार तहसीलदार यांनी संपदा नागरी सहकारी पतसंस्थेचे तत्कालीन संचालकांच्या नगर शहर व तालुक्यातील मालमत्ता जप्त करून विक्री करण्याचा निर्णय घेतला होता. लिलाव प्रक्रियाही सुरू करण्यात आली होती. या विरोधात संपदा पतसंस्थेचा तत्कालीन चेअरमन वाफारे व इतर संचालकांनी औरंगाबाद खंडपिठात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने ही याचिका फेटाळली होती.

त्यामुळे तहसीलदार संजय शिंदे यांनी जप्त मालमत्तांच्या लिलावाद्वारे विक्रीची प्रक्रिया सुरु केली आहे. १५ एप्रिल रोजी माळीवाडा येथे ज्ञानदेव वाफारे याच्या नावे असलेल्या १८६ चौ.मी. प्लॉटची लिलाव प्रक्रिया अप्पर तहसीलदार स्वप्निल ढवळे यांनी राबविली. मालमत्तेची अपसेट प्राइज ९ लाख ८२ हजार ८० रुपये होती. सदर मालमत्ता २३ लाख ५० हजारांना विकली गेली आहे. तर नेप्ती येथील सुजाता वाफारे हिच्या नावावर असलेल्या २६५.२५ चौ.मी. प्लॉटची लिलाव प्रक्रिया तहसीलदार संजय शिंदे यांनी राबविली. या मालमत्तेची अपसेट प्राइज ३ लाख ३६ हजार ८६८ रुपये होती. सदर मालमत्ता ५ लाख ५० हजारांना विकली गेली आहे.

संचालक भाऊसाहेब कुशाबा झावरे (मयत) आणि सुधाकर परशुराम थोरात यांच्या नावावर असलेल्या नालेगाव येथील २ मालमत्तांची लिलाव प्रक्रिया ८ मे रोजी होणार आहे.



सराफ, सुवर्णकार व्यापारी संघटनेच्या वतीने अतिक्रमणाबाबत दिलेले निवेदनाच्या पार्श्वभूमीवर गंज बाजार व सराफ बाजार परिसराची पाहणी करताना मनपा आयुक्त यशवंत डांगे समवेत प्रकाश लोळगे व व्यापारी (छाया : धनेश कटारिया)

## सिग्नलवर नागरीकांसाठी सावलीची व्यवस्था करावी

नगर - सध्या उन्हाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर डि.एस.पी. चौकातील सिग्नलवर नागरीकांसाठी तातडीने सावलीची व्यवस्था निर्माण करावी अन्यथा उपोषण करण्याचा इशारा अरुणकाका वृक्ष संवर्धन संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

याबाबत संघटनेचे राजेंद्र पडोळे, नारायण रोडे, गोरख रणसिंग, बाबासाहेब रणसिंग आदी पदाधिकाऱ्यांनी महापालिका आयुक्तांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, डि.एस.पी. चौकातील सिग्नलचा थांबा हा २ ते ३ मिनीटांचा असतो. या कडक उन्हाळ्यात जवळपास ४० ते ४२ अंश तापमान असलेल्या वातावरणात नागरीकांना एवढा वेळ थांबणे असह्य होत आहे. पुढे जाऊन हे तापमान ५० अंश पर्यत वाढु शकते.

नागरीकांना या उन्हाळ्यामुळे त्या ठिकाणी चक्कर (भोवळ) येण्याची शक्यता आहे. म्हणुन या ठिकाणी नागरीकांसाठी सावली निर्माण करणे अत्यावश्यक आहे व त्या ठिकाणी लोखंडी स्ट्रक्चर उभे करुन त्यावर वेल व आजुबाजुला वृक्ष संर्वधन करुन सावली निर्माण करण्यात यावी, सदर काम २० एप्रिल पर्यंत चालु करावे अन्यथा आम्ही २१ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता उपोषण सुरु करु असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

# तमाशा कलावंतांवर अमानुष हल्ल्याचा राष्ट्रीय लोक कलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समिती तर्फे निषेध

### दोषींवर कठोर कारवाई करावी; लोककलेवर वाढते हल्ले रोखण्यासाठी राज्यव्यापी आंदोलन छेडणार

नगर - पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथे आयोजित करण्यात आलेल्या यात्रोत्सवात तमाशा कलावंतांवर झालेल्या अमानुष हल्लुयाचा राष्ट्रीय लोक कलावंत दिव्यांग निराधार संघर्ष समितीच्या वतीने निषेध करण्यात आला आहे. या प्रकरणातील दोषींवर तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी समितीचे जिल्हाध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी केली आहे. तसेच, कारवाई करण्यात विलंब झाल्यास संघटनेच्या माध्यमातून राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.



महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग असलेल्या तमाशा आणि लावणीसारख्या लोककलेवर गेल्या काही काळात वारंवार हल्ले होत असल्याचे चित्र दिसत आहे. वडगाव सावताळ येथील बनाईदेवी यात्रोत्सवात कलावंतांना मारहाण करण्यात आली, तसेच महिला कलाकारांशी विटंबनाही करण्यात आली. ही घटना अत्यंत संतापजनक असून, अशा प्रकारच्या घटना आता सातत्याने घडत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर १ एप्रिल रोजी संगमनेर तालुक्यातील पुणे-नाशिक महामार्गावरील वरूडी फाटा येथेही एक धक्कादायक प्रकार घडला होता. एका वाहनचालकाने तमाशा फडाच्या गाड्यांना अडवून कलावंतांना बेदम मारहाण केली होती. या घटनेत आठ कलाकार जखमी झाले होते. त्याचप्रमाणे, काही महिन्यांपूर्वी सोलापूर जिल्ह्यातील एका यात्रेत मद्यधुंद प्रेक्षकांनी स्टेजवर चढून महिला कलाकारांशी गैरवर्तन केल्याची घटना घडली होती.

नगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात देखील कार्यक्रमादरम्यान पैशांच्या उधळणीवरून वाद निर्माण होऊन कलावंतांच्या वाद्यांची तोडफोड करण्यात आली होती. या घटनांची मालिका पाहता ग्रामीण भागात तमाशा फडांना सुरक्षित वातावरण मिळणे कठीण होत असल्याचे स्पष्ट होत आहे.

या पार्श्वभूमीवर नाना डोंगरे यांनी या घटनेचा निषेध नोंदविला. त्यांनी म्हटले की, एका बाजूला आपण तमाशा आणि लावणीसारख्या लोककलेला राज्याचा अभिमान मानतो, तर दुसऱ्या बाजूला त्याच कलेचे जतन करणाऱ्या कलावंतांवर अशा प्रकारचे हल्ले होणे ही अत्यंत लाजीरवाणी बाब आहे. डोंगरे म्हणाले की, यात्रोत्सवाच्या निमित्ताने कलावंतांना आदराने निमंत्रित केले जाते, मात्र नंतर मद्यधुंद अवस्थेत काही समाजकंटक त्यांच्याशी अभद्र वर्तन करतात, महिला कलाकारांची विटंबना करतात आणि त्यांचे साहित्यही नष्ट करतात. हे कोणत्याही सुसंस्कृत समाजाला शोभणारे नाही. कलावंत केवळ उपजीविकेसाठी नव्हे, तर महाराष्ट्राची परंपरा आणि संस्कृती जिवंत ठेवण्यासाठी रात्रभर मेहनत घेत असतात. अशा कलावंतांवर होणारे हल्ले म्हणजे आपल्या सांस्कृतिक वारशावरच घाला घालण्यासारखे आहे.

दरम्यान, तमाशा कलावंतांच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना कराव्या, प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

## महिलेचा विनयभंग करत जीवे मारण्याची धमकी

### तिघां विरुद्ध गुन्हा दाखल

नगर - शहरातील स्वास्तिक चौक परिसरातील एका अपार्टमेंटमध्ये पाणी भरण्यासाठी गेलेल्या चाळीस वर्षीय महिलेचा विनयभंग करत जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तीन संशयितांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिला आपल्या कुटुंबासह स्वास्तिक चौक भागातील एका अपार्टमेंटमध्ये वास्तव्यास आहे. अपार्टमेंटमध्ये पाणी येत नसल्याने त्यांना पाणी भरण्यासाठी खाली यावे लागते. १० एप्रिल रोजी दुपारी दीड वाजेच्या सुमारास जेव्हा पीडिता पाणी भरण्यासाठी खाली आली होती, तेव्हा तिथे भाड्याने राहणाऱ्या काही तरुणांनी अश्लील वर्तन करण्यास सुरुवात केली. संबंधित तरुणांनी पीडितेकडे पाहून अश्लील हावभाव केले आणि लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. जेव्हा पीडितेने या कृत्याचा जाब विचारला, तेव्हा संशयित आरोपी अजिंक्य रक्ताटे, प्राजक्त शेरकर आणि ज्ञानेश्वर (पूर्ण नाव माहित नाही) यांनी पीडितेचा हात धरून तिला धमकावले. यावेळी तिथे उपस्थित असलेल्या एका व्यक्तीने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला असता, आरोपींनी त्याला तसेच पीडितेच्या पतीलाही धक्काबुक्की केली आणि ही घटना कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली.

या घटनेनंतर पीडितेने १६ एप्रिल रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. पोलिसांनी या प्रकरणी अजिंक्य रक्ताटे, प्राजक्त शेरकर आणि ज्ञानेश्वर यांच्या विरोधात विनयभंग आणि धमकावल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार डाके करत आहेत.

## देविदास कुलकर्णी यांचे अल्प आजाराने निधन

नगर - येथील देविदास नारायण कुलकर्णी (वय ८०) यांचे १५ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्यामागे पत्नी, दोन विवाहित मुले, विवाहित कन्या, सुना, नातवंडे असा परिवार आहे. सावेडी भागातील चैतन्य बॅटरी व सोलर तसेच चैतन्य ट्रॅव्हल्सचे संचालक शिरीष कुलकर्णी यांचे वडील होत.

## श्रीमती गयाबाई निरफराके यांचे निधन

नगर - माळीवाडा येथील रहिवासी श्रीमती गयाबाई पांडुरंग निरफराके (वय ८०) यांचे निधन झाले. त्याच्या मागे दोन मुले, सुना, नातवंडे, असा परिवार आहे. गयाबाई या भाजीपाला विक्री चा व्यवसाय करून आपल्या कष्टाने मुलांचे संगोपन करून त्यांना मोठे केले, त्यांना भजनाची विशेष आवड होती.



स्नायडर इलेक्ट्रिक येथील राजेश निरफराके आणि पुणे येथील किर्लोस्कर न्यूमॅटिक येथील गणेश निरफराके यांच्या मातोश्री होत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.


पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित खर्च आढावा बैठकीत सूचना देताना खर्च निरीक्षक व्ही. कुमार.

## राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची तपासणी मोहीम काटेकोरपणे करा

नगर - राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीस अवघे सहा दिवस शिल्लक असताना निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय व निष्पक्ष वातावरणात पार पडावी यासाठी सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अधिक दक्षपणे व संवेदनशीलतेने काम करावे. तपासणी मोहीम अधिक काटेकोरपणे करण्याचे निर्देश खर्च निरीक्षक व्ही. कुमार यांनी दिले.

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित खर्च आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, लेखाधिकारी श्री. नागरे, उत्पादन शुल्क अधीक्षक प्रमोद सोनोने यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

खर्च निरीक्षक व्ही. कुमार म्हणाले, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर संशयास्पद हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात यावे. अवैध रोकड व मद्य वाहतुकीवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात यावे. मतदारांना कुठल्याही प्रकारचे प्रलोभन दिले जात नाही ना, याची काटेकोर तपासणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

एफएसटी, व्हीएसटी व एसएसटी पथकांनी अधिक सक्रिय राहून मतदारसंघात येणाऱ्या वाहनांची कसून तपासणी करावी. तसेच ‘पेड न्यूज’च्या अनुषंगाने माध्यमांतील बातम्यांवर सतत लक्ष ठेवावे व समाज माध्यमांवरून राजकीय पक्षांकडून करण्यात येणाऱ्या प्रचारावरही बारकाईने नजर ठेवावी. प्रचारासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याची तपासणी करूनच जाहिरातींना पूर्वप्रमाणीकरण देण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच, निवडणूक कायदे व नियमांची काटेकोर अंमलबजावणी करत नाविन्यपूर्ण संकल्पनांचा वापर करून प्रभावी कामकाज करावे, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

## अक्षयतृतीया पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील बालविवाह रोखण्यासाठी प्रशासन सज्ज

### माहिती मिळाल्यास तात्काळ चाइल्ड हेल्पलाईन क्रमांकावर कळवा : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

नगर - अक्षयतृतीयेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने विशेष सतर्कता बाळगण्यास सुरुवात केली असून, कुठेही बालविवाह होऊ नयेत यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी सतर्क राहून आवश्यक ती कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.



अक्षयतृतीया हा सण विवाहासाठी शुभ मानला जात असल्याने या दिवशी सामूहिक तसेच एकल विवाह सोहळ्यांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन केले जाते. या पार्श्वभूमीवर बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ नुसार मुलांचे किमान वय २१ वर्षे, तर मुलींचे किमान वय १८ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. या वयोमर्यादेपेक्षा कमी वयात विवाह केल्यास तो बालविवाह ठरून बेकायदेशीर मानला जातो. अशा प्रकरणांमध्ये संबंधित पालक, नातेवाईक, आयोजक तसेच विवाह सोहळ्यात सहभागी असलेल्या सर्व संबंधितांवर गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. या गुन्ह्यासाठी दंड व कारावासाची तरतूद आहे.

शासनाच्या अधिसूचनेनुसार ग्रामीण भागात ग्रामसेवकांची बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून अंगणवाडी सेविका सहाय्यक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. शहरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना प्रतिबंध अधिकारी, तर मुख्यसेविकांना सहाय्यक अधिकारी म्हणून जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

बालविवाह रोखण्यासाठी मंदिरे, मशिदी, चर्च, गुरुद्वारे, मंगल कार्यालये, बँडपथके, डीजे, केटरर्स, फोटोग्राफर तसेच विवाह विधी करणारे धर्मगुरूंनी बालविवाहास कोणत्याही प्रकारे सहकार्य करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित यंत्रणांनी अशा ठिकाणी विशेष लक्ष ठेवून आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

अक्षयतृतीया तसेच वर्षभर कुठेही बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास तात्काळ चाइल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा पोलीस हेल्पलाईन ११२ या टोल-फ्री क्रमांकावर कळविण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्हा बालविवाहमुक्त करण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहकार्य करावे, असेही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी नमूद केले.

# जिल्ह्यात उष्मालाटेचा ‘यलो अलर्ट’

नगर - भारतीय हवामान खात्याद्वारे निर्गमित संदेशानुसार, १७ एप्रिल रोजी अहिल्यानगर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी उष्मालाटेची शक्यता वर्तविण्यात आलेली असून यलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानव व पशू-प्राणी यांच्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दादासाहेब गिते यांनी केले आहे.

### प्रशासनाने नागरिकांना खालीलप्रमाणे दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या आहेत : नागरिकांनी काय करावे ?

तहान लागली नसेल तरीही दर अर्ध्या तासाच्या फरकाने पुरेसे पाणी प्यावे, शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओ.आर.एस. घ्यावे, तसेच घरी तयार करण्यात आलेली लस्सी, ताक, कैरीचे पन्हे, लिंबू पाणी इत्यादींचा नियमित वापर करावा, घराबाहेर पडताना डोके झाकण्यासाठी छत्री अथवा टोपीचा वापर करावा. तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकण्यात यावा. प्रवासात पिण्याचे पाणी सोबत ठेवावे, उन्हापासून बचाव करण्यासाठी हलकी, पातळ व सच्छिद्र सुती कपडे वापरावेत. घरे थंड ठेवण्यासाठी पडदे, शटर व सनशेडचा वापर करावा आणि रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात. पंखे, ओले कपडे यांचा वापर करावा व थंड पाण्याने वेळोवेळी स्नान करावे. अशक्तपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम ही उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखून चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.उष्णतेच्या लाटेच्या माहितीसाठी रेडीओ, टी.व्ही. किंवा वर्तमानपत्रातील माहितीचा वापर करावा.

### कामगारांसाठी व कामाच्या ठिकाणच्या सूचना

उन्हात काम करीत असल्यास कामगारांनी डोक्यावर टोपी किंवा पांढरा रुमाल बांधावा किंवा छत्रीचा वापर करावा. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करण्यात यावा आणि बाहेर उन्हात काम करीत असतांना थोड्या-थोड्या अंतराने विश्रांती घ्यावी. सूर्य प्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सूचित करण्यात यावे. गरोदर स्त्रिया व आजारी कामगारांची अधिक काळजी घेण्यात यावी.

### काय करू नये ?

दुपारी १२.०० ते ०३.०० वाजेदरम्यान घराबाहेर जाणे टाळा. उन्हात अतिकष्टाचे कामे करू नका. बाहेर तापमान जास्त असल्यास शारिरीक श्रमाची कामे टाळावीत. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. दारु, चहा, कॉफी व कार्बोनेटेड थंड पेये घेऊ नका. उच्च प्रथिनयुक्त आहार आणि शिळे अन्न खाऊ नका. उन्हाच्या कालावधीत शक्यतो स्वयंपाक करण्याचे टाळावे व मोकळ्या हवेसाठी स्वयंपाक घराची दारे आणि खिडक्या उघड्या ठेवाव्यात.

### पशू-प्राण्यांची काळजी आणि आपत्कालीन संपर्क

गुरांना आणि पाळीव प्राण्यांना सावलीत ठेवावे आणि त्यांना वेळेवर व पुरेसे पिण्याचे पाणी द्यावे. लहान मुलांना किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेवू नये. उष्माघाताची लक्षणे दिसताच सर्व नागरिकांनी तात्काळ डॉक्टरांशी संपर्क साधावा. मदतीसाठी व आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांनी १०७७, १०२, १०४, १०८ व ११२ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

# गृहिणी

## आरोग्य

### उष्माघातापासून करा बचाव

उन्हाळा खरोखरच कडक झाला आहे! उष्माघाताचा धोका टाळण्यासाठी आणि शरीरातील थंडावा टिकवून ठेवण्यासाठी उन्हाळ्यात तहान लागण्याची वाट पाहू नका. शरीरातील पाणी कमी झाल्यामुळेच उष्माघाताचा धोका वाढतो. दिवसातून किमान ३-४ लिटर पाणी प्या. साध्या पाण्यासोबतच लिंबू पाणी, कोकम सरबत किंवा वाळा घातलेले पाणी पिणे अधिक फायदेशीर ठरते. दुपारच्या जेवणात किंवा स्नॅक्समध्ये कलिंगड, काकडी, संत्री, द्राक्षे आणि खरबूज यांचा समावेश करा. ही फळे केवळ शरीराला हायड्रेट ठेवत नाहीत, तर आवश्यक इलेक्ट्रोलाईट्स देखील पुरवतात. गडद रंगाचे आणि सिंथेटिक कपडे उष्णता शोषून घेतात. त्याऐवजी पांढऱ्या किंवा फिकट रंगाचे सुती कपडे वापरा. यामुळे हवेची हालचाल व्यवस्थित होते आणि घाम सुकण्यास मदत होते. दुपारच्या जेवणानंतर एक ग्लास ताक पिण्याची सवय लावा. ताक हे शरीराचे तापमान नियंत्रित ठेवण्यास आणि पचनशक्ती सुधारण्यास मदत करते. यात थोडे जिरे पूड आणि काळे मीठ टाकल्यास अधिक उत्तम. सकाळी ११ ते संध्याकाळी ४ या वेळेत शक्यतो बाहेर जाणे टाळा. जावेच लागल्यास: डोक्याला रुमाल किंवा टोपी वापरा. डोळ्यांच्या संरक्षणासाठी सनग्लासेस लावा. जास्त तेलकट, मसालेदार अन्नामुळे शरीरात अंतर्गत उष्णता वाढते. या दिवसात हलके, ताजे आणि पचायला सोपे अन्न खाण्याला प्राधान्य द्या.

## पाककला

### मोड आलेल्या मुगाची कोशिंबीर

**साहित्य** - १ वाटी वाफवलेले मोड आलेले मूग, बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो, काकडी, थोडा लिंबाचा रस आणि मीठ.

**कृती** - सर्व साहित्य एकत्र करा. वरून थोडे तिखट किंवा काळी मिरी पूड घालू शकता. ताजी कोथिंबीर आणि पुदिना कोणत्याही कोशिंबिरीत पुदिना आवर्जून वापरा, कारण पुदिना नैसर्गिकरित्या थंड असतो. मीठ शेवटी घाला कोशिंबीर पाणीदार होऊ नये म्हणून खातानाच मीठ टाकावे. साखर ऐवजी मध जर तुम्हाला गोड कोशिंबीर हवी असेल, तर साखरेऐवजी थोडा मधाचा वापर करा.

## वास्तू

### मोबाईल क्रमांकाचा अंक

जर मोबाईल क्रमांकाचा शेवटचा अंक '३' असेल, तर त्या क्रमांकाच्या धारकाला प्रभावशाली व्यक्तींकडून अधिक प्रमाणात फोन येतात. त्यांना वारंवार अशा लोकांचे फोन येतात, जे संभाषणादरम्यान न चुकता एखादा सल्ला किंवा शहाणपणाची गोष्ट सुचवतात. तू हे अशा प्रकारे केले असतेस तर अधिक चांगले झाले असते, किंवा तू ते करायला नको होतेस.

## सौंदर्य

✻ रोज रात्री झोपण्याच्या आधी दोन थेंब बदाम तेल लावून मसाज करा त्वचेला पोषण मिळतं आणि चेहऱ्यावर चकाकी येते.

✻ चेहऱ्यावर साबणाचा अतिवापर करणे टाळा. दिवसातून एक-दोन वेळा सौम्य फ `सवॉश किंवा बेसन वापरलं तरी पुरेस आहे.

## सल्ला

किसणीवर गुळ किसताना विळीला तेलाचा हात लावावा गुळ चिकटत नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६

**---, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, अश्विनी ०९।४३, सूर्योदय ०६ वा. २६ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : पैसा खर्च होईल. संतती बरोबर मतभेद किंवा त्यांच्या चिंतेत मन व्यग्र राहील. सामाजिक क्षेत्रात अपयश येणार नाही याकडे लक्ष द्या.

**वृषभ** : नवीन कामाची सुरूवात करण्याला अनुकूल दिवस. मित्रांबरोबर दिवस आनंदात घालवाल. मागील देणी वसुल होतील.

**मिथुन** : विद्यार्थ्यांना आज अभ्यासात रस वाटणार नाही. शेअर्समध्ये गुंतवणूक करू शकाल. आध्यात्मिकतेतून शांती मिळेल.

**कर्क** : मित्र आणि कुटुंबीय यांच्याबरोबर आनंदात दिवस घालवाल. प्रवास, सहली यातूनही आज आनंद मिळवू शकता.

**सिंह** : आध्यात्मिकतेच्या मदतीने विचारातील नकारात्मकता दूर करा. मनाच्या एकाग्रतेमुळे सर्व कामात फायदा होईल.

**कन्या** : स्वकीयांचा वियोग घडू शकतो. कुटुंबातील लोकांशी मतभेद संभवतात. मिळणाऱ्या फायद्यात नुकसान होणार नाही याकडे लक्ष द्या.

**तूळ** : देण्या-घेण्याचे निर्णय विचारपूर्वक घ्या. अपघात व गैरसमज यापासून दूरच राहा. वाहने सावकाश चालवावीत.

**वृश्चिक** : शारीरिकस्वास्थ्य बिघडू शकते. विनाकारण खर्च होईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**धनु** : आज अध्यात्माकडे कल राहिल. जुने मित्र व नातेवाईक यांच्या सहवासामुळे दिवस आनंदात व्यतीत होईल. तब्येत सांभाळा.


**मकर** : उतावीळ स्वभावावर नियंत्रण ठेवून कार्ये शांततेत केल्यास आजचा दिवस हा यशदायी ठरेल. उधारी वसुल होईल.

**कुंभ** : हितशत्रूंपासून पिडा संभवते. संततीसौख्य लाभेल. कोर्ट-कचेरी आदी गोष्टींपासून लांब रहा.

**मीन** : आर्थिक व्यवहार करताना अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मागील उधारी वसूल होईल.

## शब्दगंध क्र. ७४११

सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) सोयरसंबंध; लग्न जुळविण्याची क्रिया ४) उसाचा घट्ट कढविलेला रस ७) जो कारखाना चालवितो तो किंवा त्याचा मालक ९) मऊ; मृदू; मवाळ ११) एक गुजराथी आडनाव १२) आशीर्वाद (हिंदी, उर्दू) १४) एक कर्नाटकी आडनाव; एका कर्नाटकी साहित्यिकाचे आडनाव १५) वृत्तपत्राचा मुख्य लेखक; एडिटर १७) पोस्ट आफीस; टपाल कार्यालय १९) अंगीकारलेले व्रत २१) नाटक, चित्रपटात भूमिका करणारा २२) आच; ऊब २३) वीस दस्ते कागद २४) पडदा; कापडी भिंत

**उभे शब्द :-** १) शिडी; पायरी; जिना २) ज्याला कामधंदा नाही असा ३) सारा; हात; महसूल; हस्त ४) ऐकण्याचे इंद्रिय; कर्ण ५) सोवळ्याचे रेशम वस्त्र ६) शौर्याचे वारे; स्फूर्ती ८) विशेष; स्पेशल १०) चापट; मऊ पदार्थाचा आघात १२) सकाळनंतरचा उन्हाचा काळ १३) मतभिन्नता; भांडण; कलह १४) दक्षिण भारतातील एक प्रसिद्ध नदी १५) 'युनियन'चे मराठी रूप १६) हाताचे किंवा पायचे सर्वात लहान बोट १८) सुवर्ण; सोने; कांचन २०) सलोखा; एक वेद; समेट

### शब्दगंध क्र. ७४१० चे उत्तर



### फिल्मीचक्कर क्र. १२३२ चे उत्तर



# ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻ मुलांचे विश्व ✻ ✻ ✻ ✻ ✻ ✻

**सुविचार** : मनुष्य एक अजब रसायन आहे आवडला तर दोष दिसत नाहीत, आवडला नाही तर चांगले गुण दिसत नाहीत.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### पावभाजीमध्ये बीट घालल्याने त्याचा रंग आणि चव खरोखरच वाढते का?

आपल्या सर्वांना पावभाजी आवडते, पण ती दिसायला तितकीच चवदार असते तेव्हाच ती आनंददायी असते. बरेच लोक यासाठी बीट वापरतात, पण ते पावभाजीमध्ये रंग भरते का? तर चला जाणून घेऊ या...

**पावभाजीमध्ये बीट घालण्याचे काय फायदे**

पावभाजीमध्ये आपण सर्वजण भरपूर भाज्या वापरतो, परंतु प्रत्येकाचा रंग वेगवेगळा असतो. शिवाय, वापरलेल्या मसाल्यांसोबतही पावभाजी लाल दिसत नाही. म्हणून, रंग वाढवण्यासाठी बीटरूटचा वापर केला जातो. बीटरूट पावभाजीचा रंग आणि चव दोन्ही वाढवते. बीटरूटमध्ये नैसर्गिकरित्या बीटालाइन नावाचा गडद लाल रंगद्रव्य असतो. पावभाजीमध्ये घातल्यावर, भाजीचा रंग सुंदर दिसतो. बहुतेक व्यावसायिक पावभाजींमध्येही ते वापरले जाते. शिवाय, बीटरूट खाल्ल्यानंतर वापरला गेला आहे हे लक्षातही येत नाही.

**पावभाजीमध्ये बीटरूट घातल्यावर चव कशी असते** - चवीनुसार, बीटरूटला सौम्य गोड चव असते. पावभाजीमध्ये घातल्यावर ते मसालेदार आणि तिखट चव संतुलित करते. तसेच बीटरूट उकळवा आणि ते पावभाजीमध्ये मिसळा. हे ते पूर्णपणे मिसळेल. ते भाजीमध्ये चव आणि रंग जोडते. बीटरूट भाजीमध्ये एक ताजी आणि नवीन चव जोडते, त्याची चव वाढवते. पुढच्या वेळी जेव्हा तुम्ही घरी पावभाजी बनवाल तेव्हा बीटरूट वापरा. यामुळे तुमच्या पावभाजीची चव वाढेल. शिवाय, पावभाजीचा रंग तुम्हाला तो खाण्याची इच्छा निर्माण करेल. यामुळे तुमच्या पावभाजीमध्ये वापरल्या जाणाऱ्या मसाल्यांची चव देखील संतुलित होईल.

### तुलना

एके काळी, एका जंगलात एक कावळा राहत होता. तो खूप आनंदी होता कारण त्याला फारशा इच्छा नव्हत्या. तो आपल्या आयुष्यात समाधानी होता, पण मग त्याने जंगलात एका हंसाला पाहिले आणि त्याला लगेच वाटले, हा प्राणी किती सुंदर आहे! मी यापूर्वी असा प्राणी कधीच पाहिला नाही! किती स्वच्छ आणि पांढराशुभ्र.

तो या जंगलातील इतरांपेक्षा खूपच जास्त पांढरा आणि सुंदर आहे, म्हणून तो नक्कीच खूप आनंदी असणार.

कावळा हंसाकडे गेला आणि त्याने विचारले, भाऊ, तू इतका सुंदर आहेस, म्हणून तू नक्कीच खूप आनंदी असशील?

हंसाने उत्तर दिले, हो, मी खूप आनंदी होतो, जोपर्यंत मी पोपट पाहिला नाही. त्याला पाहिल्यानंतर, मला वाटते की पोपट पृथ्वीवरील सर्वात सुंदर प्राणी आहे. आमच्या दोघांच्या शरीराचा रंग सारखाच आहे, पण पोपटाच्या शरीरावर दोन रंग आहे. त्याच्या मानेभोवती एक लाल वलय आणि एक चमकदार हिरवा रंग आहे. तो खरोखरच सुंदर होता. आता कावळ्याला वाटले की हंस पोपटास सर्वात सुंदर म्हणत आहे, म्हणून त्याला त्याला बघायलाच हवे होते.

कावळा पोपटाकडे गेला आणि त्याने विचारले, भाऊ, दोन रंग असल्यामुळे तू खूप आनंदी असशील ना?

पोपटाने उत्तर दिले, हो, जोपर्यंत मी मोराला पाहिले नाही तोपर्यंत मी आनंदी होतो. माझ्या अंगावर फक्त दोनच रंग आहे, पण मोराच्या अंगावर अनेक वेगवेगळे रंग आहे.

कावळ्याने विचार केला, सर्वात आनंदी कोण आहे ते मी शोधून काढेन. म्हणून, मला मोराला भेटायलाच हवे.

कावळ्याने जंगलात मोराचा शोध घेतला, पण त्याला एकही सापडला नाही. मोराचा शोध घेत असताना तो प्राणीसंग्रहालयात पोहोचला. त्याने पाहिले की मोराला बघायला बरेच लोक आले होते आणि त्याच्याभोवती मोठी गर्दी जमली होती.

सर्वजण निघून गेल्यावर, कावळ्याने मोराला विचारले, भाऊ, तू जगातला सर्वात सुंदर आणि रंगीबेरंगी प्राणी आहेस. लोक तुझ्यासोबत फोटो काढत होते. तू खूप आनंदी असशील, आणि तू जगातला सर्वात आनंदी प्राणी असशील ना?

हे ऐकून मोर उदासपणे म्हणाला, दादा, मी सुंदर असून काय फरक पडतो?

लोक मला या प्राणिसंग्रहालयात कैद करून ठेवतात, पण तुला कोणीही कैद करून ठेवत नाही आणि तुला पाहिजे तिथे तू मुक्तपणे फिरू शकतोस. त्यामुळे, तू जगातला सर्वात समाधानी आणि आनंदी प्राणी असशील, कारण तू मुक्तपणे जगतो. दुसऱ्या कोणीतरी त्याच्या आयुष्याचे महत्त्व समजावून सांगितल्यामुळे कावळ्याला आश्चर्य वाटले.

तात्पर्य : दुसऱ्यांचे छोटे आनंदही आपल्याला मोठे वाटतात, तर आपण आपल्या स्वतःच्या मोठ्या आनंदाकडे दुर्लक्ष करतो.



## जीवन का अमृत (भाग १)

वस्तुओं को ऊँचे और निष्पक्ष नजरिये से देखें, जिससे आपका तनाव कम होगा और आपके आसपास के लोग भी बराबर का फायदा उठाएँगे ।

आध्यात्मिक जिज्ञासु दूसरों के बहुत ऋणी हैं, जिन्हें, उन्हीं के शब्दों में, सत्य को व्यावहारिक तौर से समझाने की जरूरत है।

४०. इंसानी जिंदगी एक बड़ी नियामत है, जिसमें प्रभु तक पहुँचने की बहुत सी संभावनाएँ हैं। जो प्रभु को सच्चे दिल से पाना चाहते हैं, उनको इंसानी जन्म में, कामिल सत्गुरु की छत्रछाया में, अंतर में रूहानी तौर से विकसित होने के अवसर मिलते हैं।

४१. स्त्रियों को सचखंड पहुँचने की कोई मनाई नहीं है, क्योंकि आत्मा शाश्वत है और इसके साथ कोई लिंग नहीं जुड़ा है। यह चेतनता के महा- सागर की एक बूँद है और समय आने पर अपने स्त्रोत में मिल जाती है।

### आत्मा शाश्वत है

४२. मुझे खुशी है कि क्रिसमस और जन्म दिन के संदेशों से आपको प्रेरणा मिली। संत-महात्माओं की पवित्र शिक्षाएँ, सिद्धांत और व्यवहार सादे भी हैं और आसान भी, बशर्ते कि मन के उच्च गुणों को महान उद्देश्य के लिए काम में लाया जाए।

बालक शिष्य द्वारा, मन ही मन चुपचाप आज्ञापालन और प्रेममय सहयोग बहुत जरूरी है, क्योंकि बाकी सब सत्गुरु की दया से अपने आप हो जाएगा ।

४३. इंसान प्रकृति से एक संयुक्त जीव है तथा शरीर, मन और आत्मा के मेल से बना है। प्रभु ने इंसान को अपने रूप पर बनाया है और इसलिए संत हमें निर्देश देते हैं, आप पूर्ण बनो, क्योंकि आपका पिता (परम), स्वर्ग में रहता है, पूर्ण है ।

इंसान को तीन नेमतें मिली हैं, क्योंकि प्रभु ने उसके अंतर में बहुत गहन और असीम संभावनाएँ छुपाकर रखी हैं। उसमें छुपी दिव्यता, यानि पवित्र ज्योति, जीवन और प्रेम उसकी आत्मा की आत्मा है; पर बड़े दुख की बात है, इंसान ने इंसान का क्या हाल बनाया है और उसकी स्वयं की हालत तो और भी बुरी है । ४४. मन तभी भागता है जब आपका ध्यान टूट जाए, इसलिए अपने कार्यों को दिल और आत्मा से करने की आदत डाल लो; चाहे वह सांसारिक कार्य हो या भजन-अभ्यास हो ।

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

सुरेश ओबेरॉय : पण, एखादी गोष्ट आपल्याला समजावी म्हणून तो मित्र असं वागत असेल तर?

शिवानीदीदी : त्यांचा हेतू जरी चांगला असला तरीही इतरांकडून नकारात्मक ऊर्जा घेणं आपल्याला आवडणार नाही. जर ते टीका करत असतील तर आपल्याला त्यांचा सहवास नकोसा वाटेल आणि आपण त्यांच्यापासून लांब राहायला लागू.

सुरेश ओबेरॉय : म्हणूनच लोक पालकांपासून गोष्टी लपवतात किंवा भाऊ-बहिणी, शिक्षक आणि बॉस या सगळ्यांपासून लांब राहतात ?

शिवानीदीदी : आपण इतरांपासून लपवू शकतो पण स्वतःपासून लपवू शकत नाही. लोक आपल्याशी कसे वागतात हे जास्त महत्त्वाचं नाही. कारण, त्यांचं वागणं स्वीकारायचं अथवा नाकारायचं हे आपल्या हातात आहे. त्यांनी केलेल्या टीकेपासून आपण स्वतःला वाचवू शकतो पण आपण स्वतःच स्वतःवर केलेल्या टीकेपासून, आत्म-निंदेपासून वाचू शकत नाही.

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

सुरेश ओबेरॉय : आपण स्वतःशी बोलण्यासाठी एखादी वेळ ठरवू शकत नाही का? इतर भेटींसाठी जशा वेळा ठरवू शकतो त्याप्रमाणे आपण आपल्या मनाला नाही का सांगू शकणार की आपली एकमेकांशी बोलायची वेळ वेगळी आहे?

शिवानीदीदी : आपल्या मनात जेव्हा एखादा विचार येतो तेव्हा त्या एका विचाराबरोबर त्यासंबंधीचे अनेक विचार येतात. आपल्या मनाला आपण नंतर बोलू या, असं जरी सांगितलं तरी त्याचा विशेष परिणाम होणार नाही कारण ते विचार प्रबळ असतात. काल आपण जर एखादी चूक केली असेल तर तो विषय आजही आपल्या मनात असतो. तो विषय दाबून टाकण्यात, त्याच्यापासून बचाव करण्यात किंवा तो टाळण्यात कदाचित आपण यशस्वी होणारही नाही. असा विचार एखाद्या अस्वस्थ पाहुण्यासारखा असेल जो त्याच्या समस्येचं निदान होईपर्यंत दरवाजा ठोठावत राहील. त्यामुळे यावर लगेचच उत्तर शोधणं चांगलं. हा प्रश्न सोडवण्यासाठी स्वतःशी प्रेमाने आणि प्रशंसायुक्त बोलणं खूप महत्त्वाचं आहे.

सुरेश ओबेरॉय :

जेव्हा मी मद्यपान सोडण्याचा प्रयत्न करत होतो तेव्हा अनेकदा मी स्वतःला दिलेलं वचन पाळण्यात अपयशी होत होतो. तेव्हा प्रत्येक वेळी जर मी स्वतःशी करुणेने वागत राहिलो असतो तर मी माझा निर्णय लांबणीवर टाकत राहिलो असतो, नाही का ?

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

BF : मला तुझे 'दात खूप आवडतात...

GF : अय्यां... खरंच.. का रे?

BF: कारण "Yellow' माझा फेवरेट कलर आहे.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✻ केंद्र सरकारची वित्तीय तूट जानेवारी अखेर किती लाख कोटींवर पोहोचली आहे? - ११.६९ लाख कोटींवर

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

सीताफळ हे फळ गोलाकार, काहीसे बदामी आकाराचे, फिकट हिरव्या रंगाचे व छोट्या छोट्या गराच्या कप्प्यांनी भरलेले फळ असते. या कप्प्यांनाच बोलीभाषेत सीताफळांचे डोळे असे म्हणतात.

या फळात काळी व चिकट बी असते व या बीभोवती सफेद व गोड गर असतो. हा गरच फळ म्हणून खातात. हा गर गोड व पौष्टिक असतो. सीताफळ हे मूळचे वेस्ट इंडीज बेटे व दक्षिण अमेरिका येथील आहे. त्यानंतर ते भारतात प्राचीन काळापासून आले. सीताफळाचे झाड सहजच कोठेही माळरानावर उगवते किंवा त्याची लागवडही केली जाते. मराठीत 'सीताफळ', हिंदीमध्ये 'सीताफल', संस्कृतमध्ये 'ग्रीष्मजा'/'लवनी', इंग्रजीमध्ये 'कस्टर्ड ॲपल', तर शास्त्रीय भाषेत 'ॲनोना रेटीकुलटा' म्हणतात. सीताफळ हे 'नोनॅसी' कुळातील आहे.

### सीताफळ

औषधी गुणधर्म :

आयुर्वेदानुसार :

सीताफळ हे शीत, मधुर रसाचे, पित्तशामक, कफकारक, वृष्य व तृषाशामक आहे. तसेच हृदय, रक्तवर्धक, बलवर्धक, मांसवर्धक, तृप्तीदायक, वातशामकही आहे.

आधुनिक शास्त्रानुसार : सीताफळात कॅल्शिअम, लोह, थायमीन, रिबोफ्लेविन, नियासिन, 'क' जीवनसत्त्व व 'बी१' व 'बी२' जीवनसत्त्व असते. तसेच त्यात आर्द्रता, प्रथिने, मेद, तंतुमय, पिष्टमय पदार्थ व नैसर्गिक फलशर्कराही भरपूर प्रमाणात असते.

उपयोग :

१) सीताफळामध्ये कॅल्शिअम व लोह ही खनिजे भरपूर प्रमाणात असल्यामुळे वाढत्या वयातील मुला- मुलींना सीताफळ दिल्यास त्यांची वाढ उत्तम रितीने होऊन शरीर सुदृढ बनते.

२) स्त्रियांच्या आरोग्यासाठीही सीताफळ उत्तम आहे. बाळंतपणानंतर तसेच चाळिशीनंतर अनेक स्त्रियांमध्ये रक्ताचे व कॅल्शिअमचे प्रमाण कमी होते. सीताफळाने ही झीज भरून येते. यासाठी सीताफळसत्त्व हे औषध उत्तम आहे. याचा वापर वर्षभर करता येतो.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# कलीयुगाच्या प्रभावापासून स्वतःला वाचवण्यासाठी भगवान श्रीकृष्णाचे नामचिंतन प्रभावी : इंद्रेश उपाध्याय

नगर – कलीयुगाच्या प्रभावापासून स्वतःला वाचवण्यासाठी श्रीकृष्णाचे नामचिंतन प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन वृंदावन निवासी इंद्रेश उपाध्याय यांनी केले. दहीहंडी फोडत झालेल्या नंदोत्सवात हजारो श्रोते भक्तिरसात चिंब झाले.

येथील श्रीमती कौशल्यादेवी गौरीशंकरजी गुप्ता, महेश गुप्ता आणि आयुष गुप्ता यांनी सावेडी मधील मिस्कीन मळ्यात आयोजित केलेल्या श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळ्याचे तृतीय पुष्प गुंफताना ते बोलत होते. सुधीर झालानी, किसनलाल बंग व प्रदिप पंजाबी यांच्यासह शहरातील भाविकांनी नंदोत्सवाची जय्यत तयारी केली होती. व्यासपीठासमोरील प्रशस्त मंडपात १५ दहीहंडी आकर्षकरितीने बांधल्या होत्या.

इंद्रेश उपाध्याय पुढे म्हणाले, जुगार, पैज लावणे, मदिरापान, मांसाहार, कोणतेही व्यसन, परस्त्रीगमन, हाणामारी–हिंसा, खोटे बोलणे, अनैतिक कर्म, वर्क फ्रॉम होम हे सर्व कलीयुगाच्या प्रभावाखाली आहे. भगवान नारायणाची पत्नी असलेल्या लक्ष्मीला समोर ठेवून पैज लावणे, जुगार खेळणे यामुळे प्रत्यक्ष नारायण क्रोधीत होतात. मांसाहार ही हिंसाच असल्याने महापाप आहे. स्त्रीच्या गर्भातील बाळाला मारल्याने भ्रुणहत्येचे पाप घडते, तसे अंडे फोडण्यानेही भ्रुणहत्येचे पाप घडते. अंड्यामधून नवीन जीव निर्माण होणार असतो. अंडे खाणे म्हणजे भ्रुणहत्येचे पाप डोक्यावर घेणे. नशा येणाऱ्या पदार्थांपासून सदैव दूर रहा. देवतांशी नशेचा संबंध जोडू नका. अनितीने धन कमावू नका. काहीही मेहनत न करता आलेले धन सेवा कार्यात समर्पण करा. प्रसिद्धी मिळवण्यासाठी नव्हे तर निरपेक्ष भावनेने दान करा. आई–वडिल आणि गुरू यांचा कायम आदर करा.

### दहीहंडी फोडत झालेल्या नंदोत्सवात हजारो श्रोते भक्तिरसात चिंब





त्यांचा शब्द प्रमाण माना. त्यातच कल्याण सामावले आहे.

संत, साधू, महात्मा, कथा निरूपणकार, भक्त आणि मंदिर यांची चेष्टा कधीही करू नका. धन कमवणे अत्यावश्यक आहे तसे आपला जन्म कशासाठी? याचे सतत स्मरणही आवश्यकच आहे. भगवंताच्या नामस्मरणाने अखेरचा श्वास घेताना मुखातून भगवंताचे नाम आले तरच मुक्ती मिळेल. भगवंत भक्तांच्या डोळ्यात पाणी पाहू शकत नाही, हे लक्षात घ्या. आजही भगवंताच्या लिलांचा आनंद मिळवता येतो. वृंदावनात २४ तास रहा, भगवान श्रीकृष्णांची भेट होतेच! श्रीकृष्ण सर्वांना भेटतात, मात्र ते भेटल्याचा आनंद घेता आला पाहिजे.

युवक–युवतींना संबोधित करताना इंद्रेश उपाध्याय म्हणाले, प्रेम करावेसे वाटले तर विठ्ठलावर, पांडुरंगावर, श्रीकृष्णावर प्रेम करा. भगवंताचे प्रेम मिळाले की, इतर कशाचीही अपेक्षा रहाणार नाही. जीवन सार्थक होईल.

२१ दिवसांच्या नंदोत्सवाची माहिती दिल्यानंतर इंद्रेश उपाध्याय यांनी स्वतः दहीहंडी फोडण्यास सुरुवात केली. तेव्हा उपस्थित सर्वांनी नंदोत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. संगीताचे कर्णमधूर सूर आणि श्रीकृष्ण नामाचा जयजयकार यामुळे वातावरण भारावून गेले होते. शहराच्या इतिहासात प्रथमच असा शाही नंदोत्सव सोहळा झाला, अशा प्रतिक्रिया भाविकांमधून उमटल्या.

# प्रेरणादायी अक्षरधन

## तैसे ज्ञानाचे बोलणे

“मुसाफिर” वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी डॉ. रामचंद्र देखणे ‘चपराक’ प्रकाशित ललित चिंतन

आपण खूप बोलत असतो. कुणी ऐकत आहे की नाही याचे भानही न ठेवता बोलतच राहतो. किती बोलावे आणि काय बोलावे याला अजून कुणी मर्यादा घातल्या नाहीत पण विधात्याने निर्मिती करताना हे बंधन घातले आहे. माणसाने दुप्पट ऐकावे आणि एकपट बोलावे म्हणून दोन कान दिले आहेत पण तोंड मात्र एकच दिले आहे.

बोलणे ही मनाची अभिव्यक्ती असते तर ऐकणे ही अंतर्मनाची शक्ती असते. इंग्रजीत ज्याला ’लर्नेड’ म्हणतात त्याला मराठीत ‘बहुश्रुत’ म्हणतात. दुर्दैवाने आजच्या इलेक्ट्रॉनिक विश्वात ऐकणे आणि ऐकविणे ही परंपराच जणु नष्ट होत चालली आहे. श्रुत आणि श्रुती हे शब्द केवळ अध्यात्मापुरते मर्यादित नाहीत. चांगले ऐकणे याच लोकश्रुती ठरतात. त्यासाठी चांगले ऐकविणारे म्हणजे सांगणारे असावे लागतात. संत ज्ञानदेव फार सुंदर उदाहरण देतात.

तैसे ज्ञानाचे बोलणे । आणि येणे रसाळपणे ।
आता पुरे कोण म्हणे । आकर्णिता ।।
ज्ञाने. १२/६४३

बोलणे ज्ञानाचे असावे आणि रसाळही असावे. मग ऐकणारा ’आता पुरे करा’ असे म्हणेल का? कित्येक वेळा एखाद्या रटाळ व्याख्यानात श्रोत्यांना वेठीस धरले जाते आणि नाईलाजास्तव श्रोत्यातून चिठ्ठी पाठवली जाते पण बोलणे जर आशयपूर्ण म्हणजे ज्ञानाचे असेल आणि रसाळ असेल तर श्रोतेही त्याला तितकीच दाद देतील आणि श्रवणसुखाची मांडणी उभी राहील. खरे तर ज्ञान हे तत्त्वदर्शी म्हणजे सांगण्यासाठी अतिशय कठीण शिवाय ते शास्त्राने परिपूर्ण. मग रुक्षतेने ते मांडले जाते.

तत्त्वज्ञानाच्या गहन सिद्धांतातून ज्ञान सांगताना रसाळता कुठून येणार? असेही म्हटले जाते. ज्ञानाचे बोलणे हे तीन प्रकारचे होय. १) ज्ञान या विषयाचे बोलणे. २) ज्ञान या अवस्थेबद्दल किंवा अनुभूतीबद्दल बोलणे आणि ३) ज्ञानवंतांचे बोलणे. जगात ज्ञानाइतके शुद्ध आणि पवित्र काही नाही. ज्ञानदेव म्हणतात,

येथ ज्ञानाची पवित्रता । ज्ञानची आथि ।।

खरा ज्ञानवंत कधीही रुक्षतेने ज्ञान मांडत नाही. म्हणून तर ज्ञानदेव गीतेसारख्या शास्त्राला ज्ञानेश्वरीच्या काव्यातून उभे करतात. व्यासही सर्व शास्त्रांचे दर्शन गीतेच्या काव्यातून मांडतात. अनुभूतीविना मुखातून येणारे ज्ञानाचे शास्त्र क्लिष्ट असेल पण अनुभूतीतून जेव्हा ते बाहेर येते तेव्हा ज्ञानाचे बोलणे रसाळ होते आणि दुसरे म्हणजे जेव्हा बुद्धी ही सृजनाच्या अवस्थेला येते आणि ज्ञान प्रेमाने व्यक्त होते तेव्हा ज्ञानाचे बोलणे रसाळ होते.

**– किशोर गांधी**



इंद्रेश उपाध्याय महाराज यांना देण्यात आला ईश्वरीय संदेश

माउली संकुल येथे आयोजित कार्यक्रमाच्या निमित्ताने वृंदावन येथील भागवत कथाकार आणि आध्यात्मिक उपदेशक इंद्रेश उपाध्याय महाराज आले असताना जगभरातील १२३ देशात ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या अहिल्यानगर सेवाकेंद्राच्या सहसंचालीका व प्रेरक वक्ता ब्रह्माकुमारी सुप्रभा दीदी व १८४ विश्वविक्रम करणारे १ ले भारतीय ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ. दीपक हरके यांनी त्यांची भेट घेऊन ध्यानधारणेची पुस्तके भेट दिली व श्रीकृष्णाची फ्रेम देऊन त्यांना सन्मानित केले. यावेळी बी के इंदिरा दीदी उपस्थित होत्या.

# डॉ. पी.ए.इनामदार विद्यालयातील विद्यार्थ्यांचे मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत उत्तुंग यश संपादन

नगर – तपोवन रोड येथील डॉ. पी.ए.इनामदार विद्यालयातील इयत्ता दुसरी मधील विद्यार्थीनी लावण्या अंबादास बाचकर हिचा राज्य गुणवत्ता यादीमध्ये १८ वा जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये १३ व केंद्र गुणवत्ता यादीमध्ये ८ वा तसेच अन्वी संदीप बुरुंगुले या विद्यार्थिनीचा राज्य गुणवत्ता यादीमध्ये २२ जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये १७ व केंद्र यादीमध्ये ११ क्रमांक आला आहे.

तसेच इयत्ता तिसरीतील शिवम सुरेश मैड या विद्यार्थ्यांचा राज्य गुणवत्ता यादीमध्ये ३७ जिल्हा यादीमध्ये ३२ व केंद्र यादीमध्ये ९ क्रमांक आला आहे.

त्याचप्रमाणे इयत्ता चौथी मधील मोईनुद्दीन इरफान शेख या विद्यार्थ्यांचा राज्य गुणवत्ता यादीमध्ये १७ जिल्हा यादीत १२ व केंद्र यादीमध्ये ३ क्रमांक आला आहे.




तसेच इयत्ता चौथी आफान कादर शेख या विद्यार्थ्याने राज्य गुणवत्ता यादीमध्ये १७ जिल्हा गुणवत्ता यादी १२ व केंद्र गुणवत्ता यादी ३ क्रमांक मिळवला आहे.

तसेच इयत्ता चौथीतील उजेर नशरत शेख या विद्यार्थ्याने राज्य गुणवत्ता यादी २४ जिल्हा गुणवत्ता यादीत १९ केंद्र गुणवत्ता यादीत ९ क्रमांक मिळवला आहे.

त्याचप्रमाणे इयत्ता दुसरी तिसरी व चौथी या वर्गातील अनुक्रमे दहा दहा विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या श्रीमती शिल्पा शिंदे, अमोल निमसे, श्रीमती प्रियंका बोरुडे यांचे संस्थेचे अध्यक्ष एन ए पठाण, शाला समिती चेअरमन अनिल साळुंके, शाळेचे सचिव समीर पठाण, शाला समिती पदाधिकारी गणेश गरड व देविदास डहाळे तसेच विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कुंदा झोंड यांनी अभिनंदन केले.

# जर्मनीस्थित आयएमएसच्या माजी विद्यार्थ्याशी ऑनलाईन संवादातून ‘कृत्रिम बुद्धिमत्ते’चा वेध




नगर – अहिल्यानगर येथील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड करिअर डेव्हलपमेंट (आयएमएस) हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेले एक शिक्षणसंस्थान आहे. येथे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर व्यावसायिक कौशल्ये, संशोधनवृत्ती आणि नवोन्मेषी दृष्टिकोन विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. दरवर्षी संस्थेच्या वतीने प्रकाशित होणारे महाविद्यालयीन रिफ्लेक्शन मासिक हे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलता, विचारशक्ती आणि यशस्वी वाटचालीचे प्रभावी माध्यम ठरते. यावर्षीच्या रिफ्लेक्शन या मासिकासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स – एआय) हा अत्यंत समकालीन आणि महत्त्वाचा विषय निवडण्यात आला आहे.

आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता विविध क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. उद्योग, शिक्षण, आरोग्य, वाहतूक आणि संप्रेषण या सर्वच क्षेत्रांमध्ये एआय तंत्रज्ञानाचा वेगाने विस्तार होत असून, भविष्यातील विकासाचा हा एक महत्त्वाचा पाया मानला जात आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना या क्षेत्राची सखोल माहिती मिळावी, तसेच त्यांना योग्य दिशा मिळावी या उद्देशाने मासिक समितीने तज्ज्ञ व्यक्तीची मुलाखत घेण्याचा उपक्रम राबविला.

या अनुषंगाने, संस्थेचे माजी विद्यार्थी आणि सध्या जर्मनीमध्ये कार्यरत असलेले कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील अभ्यासू पुष्कर सांगळे यांच्याशी ऑनलाईन माध्यमातून विशेष संवाद साधण्यात आला. श्री. सांगळे हे एक अनुभवी असून त्यांनी मर्सिडीज–बेंझमध्ये कार्य करताना अत्याधुनिक मल्टिमोडल व्हॉईस एआय प्रणालींच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. ऑटोमॅटिक स्पीच रेकग्निशन (एएसआर), नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग (एलएलपी), वेक–वर्ड डिटेक्शन आणि मल्टी–व्हीपीए इंटिग्रेशन यांसारख्या प्रगत तंत्रज्ञानांमध्ये त्यांना विशेष प्राविण्य आहे.

शैक्षणिक कारकिर्दीबाबत बोलायचे झाल्यास, त्यांनी आयएमएस अहिल्यानगर येथून एमसीए पदवी संपादन केली असून, त्यापूर्वी न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज येथून विज्ञान शाखेची पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या प्रवासात त्यांनी मर्सिडीज्–बेन्झ इनोवेशन लॅब, हार्मन इंटरनॅशनल, सायन्टिफीक गेम्स, केपीआयटी कमीन्स इन्फोसिस्टीम्स् लिमिटेड आणि इन्फोसिस यांसारख्या संस्थांमध्ये कार्य करत विविध अनुभव मिळवले आहेत.

ही मुलाखत ऑनलाईन पद्धतीने पार पडली असून, विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेतील करिअर संधी, उद्योगांवरील प्रभाव, रोजगारातील बदल, एआय साधनांचा वाढता वापर, तसेच या क्षेत्रातील भविष्यातील संधी यांसारख्या विविध पैलूंवर आधारित प्रश्न विचारले. याशिवाय भारत आणि जर्मनीतील कार्यसंस्कृतीतील फरक आणि जागतिक स्तरावरील अनुभवांवरही सखोल चर्चा करण्यात आली.

या मुलाखतीत श्री. सांगळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नमूद केले की, कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ तांत्रिक संकल्पना नसून ती उद्योगांच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणणारी शक्ती आहे. एआय मुळे अनेक प्रक्रिया अधिक जलद आणि परिणामकारक झाल्या असून, नवीन रोजगार संधी निर्माण होत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना सतत शिकण्याची सवय, जिज्ञासा आणि तांत्रिक कौशल्ये विकसित करण्याचे महत्त्व पटवून दिले.

संस्थेचे संचालक डॉ. एम. बी. मेहता यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. डॉ. मनोज कुलकर्णी आणि डॉ. अंजली वैद्य यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी ही मुलाखत अत्यंत प्रभावीपणे पार पाडली.

मुलाखत घेणारे विद्यार्थी रिफ्लेक्शन मासिक समिती सदस्य) : सिद्धी गांधी (एमबीए – द्वितीय वर्ष), खुशबू भाटिया (एमबीए – प्रथम वर्ष), दिव्या चौधरी (एमबीए – द्वितीय वर्ष), सृष्टी काळे (एमबीए – प्रथम वर्ष), यश उधारे (एमबीए – द्वितीय वर्ष), ओम पेंडुरकर (एमसीए – प्रथम वर्ष), प्रफुल्ल देसले (एमसीए – प्रथम वर्ष), सॅम्युअल तिवडे (एमसीए – प्रथम वर्ष)

या संवादातून विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रातील संधी आणि भविष्यातील दिशा याबाबत मौल्यवान मार्गदर्शन मिळाले.

# निराधार योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत अहिल्यानगर जिल्ह्याला राज्यात अव्वल स्थान

### उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान



महसूल अधिकाऱ्यांच्या बैठकीत उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

नगर – जिल्ह्यात सामाजिक विशेष सहाय्य योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत उल्लेखनीय यश मिळवत अहिल्यानगर जिल्ह्याने राज्यात अव्वल स्थान पटकावले आहे. जिल्ह्यातील १ लाख ३८ हजार लाभार्थ्यांना तब्बल २४८ कोटी ३८ लाख २४ हजार रुपयांचे अनुदान थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे वितरित करण्यात आले आहे. या यशस्वी कामगिरीबद्दल उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रक व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

जिल्ह्यात राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना आणि राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या सर्व योजनांतील पात्र लाभार्थ्यांचे शंभर टक्के आधार संलग्नीकरण पूर्ण करण्यात आले असून, त्यांच्या खात्यांमध्ये थेट अनुदान जमा करण्याची प्रक्रिया यशस्वीरीत्या राबविण्यात आली आहे. तसेच, दिव्यांग लाभार्थ्यांचे यूडीआयडी कार्ड योजनांशी संलग्न करण्याचे कामही पूर्ण करण्यात आले आहे.

योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणारे जिल्हा समन्वयक रविंद्र ज्ञानदेव घावटे व महसूल सहाय्यक श्रीमती शाजिया सलीम पठाण यांना महसूल अधिकाऱ्यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी अपर जिल्हाधिकारी शैलेश हिंगे व बाळासाहेब कोळेकर, तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदार उपस्थित होते.

तालुकास्तरावर प्रत्यक्ष अंमलबजावणीत मोलाचे योगदान देत उद्दिष्ट साध्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही सन्मान करण्यात आला. यामध्ये संजय गांधी योजनेचे तहसीलदार शीतलकुमार सावळे, कोपरगावचे तहसीलदार महेश सावंत व तालुका समन्वयक श्रीमती अर्चना जायकर, श्रीरामपूरचे नायब तहसीलदार दत्तात्रय शेकटकर व श्रीमती निर्मला नाईक, तसेच अहिल्यानगर तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार गणेश भानवसे व तालुका समन्वयक श्रीमती वैष्णवी दुधाळ यांचा समावेश आहे.

जिल्हा प्रशासनाच्या समन्वित प्रयत्नांमुळे निराधार व वंचित घटकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ प्रभावीपणे पोहोचत असून, पारदर्शक व वेगवान अंमलबजावणीमुळे जिल्ह्याने राज्यात आदर्श निर्माण केला आहे.

# बुरुडगाव रोड येथे मुलांसाठी एसबी समर कॅम्पचे आयोजन

नगर – बुरूडगाव रोडवरील तीर्थंकर कॉलनी येथील बदामीहास येथे एसबी समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. २० ते २७ एप्रिल या कालावधीत सायंकाळी ४.३० ते ६.३० यावेळेत हे शिबिर होणार आहे. ४ ते ९ वर्षे वयोगटातील मुलामुलींना यात सहभागी होता येईल, अशी माहिती आयोजक सुप्रिया लोढा व भक्ती कर्नावट यांनी दिली.



समर कॅम्पमध्ये वेलकम पार्टी, म्युझिकल योगा व मेडीटेशन, होम डेकोरेटिव्ह आर्ट ॲण्ड क्राफ्ट, मेंदू विकास ॲक्टिव्हिटी, ट्रेकिंग, सिनेमा, ऐतिहासिक स्थळांना भेटी, बाल संस्कार, कथाकथन, एक मिनिट फन गेम, क्रिकेट बॅटल, टिम बिल्डिंग गेम, दररोज सरप्राइज यासह विविध क्रियाकल्प असणार आहेत.

प्रवेश व अधिक माहितीसाठी संपर्क: ९५५२५७०९८८, ८०८७९००५००.

# महावीर इंटरनॅशनलतर्फे आनंदऋषीजी ब्लड बँकेस जलशुद्धीकरण मशीन भेट

नगर – महावीर इंटरनॅशनलच्या महिला विभागाच्या वतीने आनंदऋषीजी ब्लड बँकेस आरो जलशुद्धीकरण मशीन भेट देण्यात आले. आ.संग्राम जगताप यांनी फीत कापून जलशुद्धीकरण मशीनचे लोकार्पण केले. यावेळी प्रमुख पाहुणे उपमहापौर धनंजय जाधव, नगरसेविका मीना चोपडा, अनिता शेटिया व सुनिता फलसौंदर आदी उपस्थित होते. महिला आघाडीच्या अध्यक्षा वर्षा बाफना, सेक्रेटरी अपर्णा बोथरा व खजिनदार उल्का पारख तसेच अध्यक्ष राजेंद्र बोथरा, सेक्रेटरी वसंत बोरा, खजिनदार गौतम पारख. सतीश चोपड़ा, सरला बरमेचा, नीलेश बोथरा, अक्षय बाफना आदींसह सदस्य उपस्थित होते.



महावीर इंटरनॅशनलच्या महिला विभागाच्या वतीने आनंदऋषीजी ब्लड बँकेस देण्यात आलेल्या जलशुद्धीकरण मशीनचे लोकापर्ण करताना आ.संग्राम जगताप.

या प्रसंगी नगर केंद्राच्या निर्मला बाफना, नरेंद्र बाफना, दिलीप कर्नावट, डॉ. प्रकाश कांकरिया, माणिकचंद कटारिया, वैशाली शेटीया, अरुण पारख, अरुणा सुराणा, अपर्णा बोरा, सुनिता कर्णावट, सरला बरमेचा, सतीश बोथरा, सतीश चोपडा, दिनेश शिंगवी, राजेंद्र बलदोटा, किरण राका, निर्मला बाफना, निलेश बोथरा, सुमित लोढा, सुरेखा पारख, उज्वला बोथरा, सज्जनबाई कटारिया, मनीषा शिंगवी आदींसह सदस्य उपस्थित होते.



प्रयास ग्रुप व दादी-नानी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या कार्य-कर्तृत्वाचा जागर करणारा कार्यक्रम रेणुका माता रिसॉर्ट येथे उत्साहात पार पडला.

# प्रयास व दादी-नानी ग्रुपकडून महिलांच्या सक्षमीकरणाचा जागर

नगर - प्रयास ग्रुप व दादी-नानी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांच्या कार्य-कर्तृत्वाचा जागर करणारा कार्यक्रम रेणुका माता रिसॉर्ट येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमातून महिलांच्या सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला. या सोहळ्याप्रसंगी रेणुका माता मल्टीस्टेटच्या संचालिका मंगलाताई भालेराव, जयंती भालेराव, नगरसेवक ऋग्वेद गंधे, मीनलताई गंधे, सुमित वर्मा, जयश्री पोटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमासाठी दादी-नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, प्रयासच्या संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, शोभा मुळे, जयश्री पुरोहित, उपाध्यक्ष सुचेता बोरकर, खजिनदार मेघना मुनोत, राखी अहिर, छाया भंडारी, प्रतिभा रासकर, सुजाता कदम, आरती थोरात, लीला अग्रवाल, सुरेखा जंगम, अरुणा गोयल, अलका वाघ, सुनीता काळे, नीलिमा पवार, उषा सोनटक्के, प्रतिभा पेंडसे, आरती वाडेकर, आशा गायकवाड, रेखा फिरोदिया आदींसह ग्रुपच्या महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमात जयश्री पोटे यांनी महिलांना स्कार्फ कसा बांधावा आणि ओढणी कशी घ्यावी याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. तसेच गायिका आशा भोसले यांचे नुकतेच निधन झाल्याबद्दल ग्रुपतर्फे त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रास्ताविकात जयाताई गायकवाड यांनी ग्रुपच्या कार्याचा आढावा घेतला. त्या म्हणाल्या की, मागील अनेक वर्षांपासून प्रयास ग्रुप महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्यरत आहे. महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली जावी तसेच त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. आज अनेक महिला या ग्रुपशी जोडल्या गेल्या असून सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात सक्रिय भूमिका बजावत असल्याचे स्पष्ट केले. पाहुण्यांचे स्वागत अलकाताई मुंदडा यांनी केले.


नगरसेवक ऋग्वेद गंधे म्हणाले की, आजच्या काळात महिलांचा सहभाग प्रत्येक क्षेत्रात वाढत आहे, ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. महिलांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता समाजकार्यातही पुढाकार घ्यावा. प्रयास व दादी-नानी ग्रुपसारख्या संस्था महिलांना एक व्यासपीठ देतात, जिथे त्या आपले कौशल्य विकसित करू शकतात. अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक बदल घडून येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सुमित वर्मा यांनी आई ही प्रत्येकाच्या आयुष्यातील सर्वात मोठी प्रेरणा असते. तिच्या ममतेची तुलना कोणाशीच होऊ शकत नसल्याचे स्पष्ट करुन आईच्या ममतेवर आधारित भावस्पर्शी गाणे सादर केले, ज्याला उपस्थित महिलांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

मंगलाताई भालेराव म्हणाल्या की, महिलांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाकडे लक्ष देणेही तितकेच महत्त्वाचे आहे. लहानसहान गोष्टींमधूनही आत्मविश्वास वाढतो. प्रयास ग्रुपने महिला सक्षमीकरणाची चळवळ चालवली असून, या कार्यात रेणुका माता मल्टीस्टेटचा नेहमीच सहकार्य राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात महिलांसाठी विविध मनोरंजनात्मक व बौद्धिक खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांना महिलांनी प्रतिसाद दिला. विजेत्या महिलांना आकर्षक बक्षिसे देण्यात आली तसेच सोडतीद्वारे काही भाग्यवान महिलांनाही बक्षिसे प्रदान करण्यात आली. महिलांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. सूत्रसंचालन गौरी जोशी यांनी केले. सुचेता बोरकर यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दीपा सोनी व उज्वला मालू यांनी परिश्रम घेतले.

# अहिल्यानगरमध्ये 'दुसरे बालपण' स्पर्धा ज्येष्ठांसाठी कला-आनंदाचा अनोखा उत्सव




नगर - ज्येष्ठ नागरिकांच्या कला गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. कांकरियांचे मानकन्हैय्या ट्रस्ट यांच्या वतीने 'दुसरे बालपण स्पर्धा २०२६' या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. देशातील पहिलीच अशी ही स्पर्धा असून यंदा तिचे तिसरे वर्ष साजरे होत आहे. या स्पर्धेचा मुख्य उद्देश ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दुसऱ्या बालपणात आनंद, सर्जनशीलता आणि आत्मविश्वास देणे हा आहे. 'खास ज्येष्ठ नागरिकांसाठी कला-आनंद उत्सव' या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. अशी माहिती स्वागताध्यक्ष व ट्रस्टच्या कार्याध्यक्ष डॉ. सुधा कांकरिया यांनी दिली.

विविध कला प्रकारांचा समावेश - या वर्षीचा विषय 'विवाह सोहळा एक उत्सव' असा ठेवण्यात आला असून, सहभागी स्पर्धकांनी या विषयावर आधारित सादरिकरण करायचे आहे. स्पर्धेमध्ये नाटिका, संगीत नाटिका आणि नृत्यनाटिका असे विविध सादरीकरण प्रकार ठेवण्यात आले आहेत. त्यात कमीत कमी ४ कलाकार व जास्तीत जास्त १२ कलाकारांना सहभागी होता येईल. सादरीकरणाचा कालावधी कमीत कमी ८ मिनीटे व जास्तीत जास्त १२ मिनीटांपर्यंतचा असेल असे संयोजन समितीच्या वतीने कळविण्यात येत आहे.

स्पर्धेची तारीख व स्थळ - ही स्पर्धा २० मे रोजी माऊली सभागृह, सावेडी, अहिल्यानगर येथे होणार आहे. स्पर्धेसाठी अर्ज भरण्याची अंतिम तारीख ४ मे ठेवण्यात आली आहे.

आकर्षक पारितोषिके - स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देण्यात येणार आहेत. सांघिक प्रथम पारितोषिक : रू ५०००/- करंडक व प्रमाणपत्र., सांघिक व्दितीय पारितोषिक : रू ३०००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र., सांघिक तृतीय पारितोषिक : रू २०००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र., सांघिक उत्तेजनार्थ पारितोषिक : रू १०००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र. विशेषत: उत्कृष्ट लेखनासाठी स्वतंत्र पारितोषिकाचीही तरतूद करण्यात आली आहे अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. प्रकाश कांकरिया यांनी दिली.

संपर्क व नोंदणी - इच्छुकांनी अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी प्रिया दिदी यांच्याशी ९८५०८८७८३८ या क्रमांकावर संपर्क साधावा.

ज्येष्ठ नागरिकांच्या कलागुणांना वाव देत त्यांच्या आयुष्यात नवचैतन्य निर्माण करणारा हा 'दुसरे बालपण' उपक्रम समाजात सकारात्मक संदेश देणारा ठरत आहे. सदर स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी पी डी कुलकर्णी, चंद्रकांत पालवे, सदाशिव मोहिते, नंदकुमार देशपांडे, प्रशांत कटके, जयंत येलूलकर, प्रसाद बेडेकर, चंद्रकांत पंडित, प्रिया सोनटक्के, रामदास केदार, दिपक शिरसुल हे परिश्रम घेत आहेत.

# विविध सामाजिक उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांना आनंदाची पर्वणी : बाबासाहेब वाकळे



## श्री स्वामी समर्थ जेष्ठ नागरिक चौथा वर्धापन दिन उत्साहाने साजरा

नगर - भुतकरवाडी येथील श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने वर्षभर विविध आरोग्य शिबिरे, ज्येष्ठ नागरिकांसाठी सहलीचे आयोजन, नेत्र तपासणी शिबिर, दंतरोग तपासणी शिबिर, वृक्षारोपण, ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस, स्नेह मेळावा, सर्व रोग निदान शिबिर अशा सामाजिक व धार्मिक कार्यक्रम साजरे केले जातात. ज्येष्ठ नागरिकांसाठी संघाचे अध्यक्ष भीमाशंकर लांडे यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्य कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन नगरसेवक बाबासाहेब वाकळे यांनी केले आहे.

सावेडी येथील भुतकरवाडी येथे श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाचा चौथा वर्धापन दिनानिमित्त ज्येष्ठ नागरिकांचा स्नेह मेळावा उत्साहात पार पडला. साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांनी सेवानिवृत्ती नंतर आनंदी जीवन कसे जगावे? यावर उदबोधक व्याख्यान दिले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षपद संघाचे अध्यक्ष भीमाशंकर लांडे भूषविले. यावेळी प्रमुख उपस्थितीत माजी महापौर बाबासाहेब वाकळे, नगरसेवक रवींद्र बारस्कर, विलासराव ताठे, नगरसेविका वंदना ताठे, डॉ.संजय कळमकर, शिवाजी कराळे, रघुनाथ कोतकर, विजय महादर, हरिभाऊ टकले, विश्वनाथ जाधव, संभाजीराव काळे, सचिव अप्पा बेद्रे, कोकाटे, सह सचिव गणपतराव हिंगे, राजू मोरे, आप्पा सुरोसे, कां. ता. तुंगार, संघाचे संचालक सौ. रत्नमाला लांडे, चंपाताई जगताप, रमेश मुसळे, सुनील काळे, दत्तात्रय भगत, दिनकर देशमुख आदी उपस्थित होते.

रवींद्र बारस्कर म्हणाले, श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने वर्षभर समाज उपयोगी उपक्रम राबविले जातात. या उपक्रमामुळे ज्येष्ठ नागरिकांना आनंदी जीवन जगण्याचा मंत्र मिळतो. ज्येष्ठ नागरिक संघाने आदर्शवत असे कार्यक्रम राबविले आहेत. श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघात सारखे कार्य उभे राहिल्यास वृद्धाश्रम होणारच नाही.

वंदनाताई ताठे म्हणाल्या, ज्येष्ठ नागरिकांसाठी सहलीचे आयोजन करण्यात येते. तसेच वर्षभर होणाऱ्या विविध उपक्रमामुळे शिबिराचे माध्यमातून आरोग्याची काळजी घेतली जाते.

शिवाजी कराळे म्हणाले, सेवानिवृत्तीनंतर ज्येष्ठ नागरिकांनी छंद जोपासावेत. निरोगी जीवन जगण्यासाठी नियमित व्यायाम करावा.

भीमाशंकर लांडे म्हणाले, ज्येष्ठ नागरिकांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी ज्येष्ठ नागरिक संघाची स्थापना करण्यात आली आहे. गेल्या चार वर्षात ज्यष्ठ नागरिकांसाठी विविध आरोग्य शिबिरे, धार्मिक कार्यक्रम तसेच मनोरंजनात्मक कार्यक्रम घेण्यात आले. श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य, निरोगी, सुदृढ व कार्यक्षम राहावे. यासाठी जेष्ठ नागरिक संघ प्रयत्नशील असतो.

या कार्यक्रमात सर्व ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला. संघाचे संचालक सौ. रत्नमाला लांडे यांच्या वतीने सर्व ज्येष्ठ नागरिकांना पंचरत्न हरिपाठ या पुस्तकाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपानंतर जेष्ठ नागरिकांना स्नेहभोजन देण्यात आले.

सुत्रसंचलन विश्वनाथ जाधव यांनी केले. दिनकरराव देशमुख यांनी आभार मानले.



शिक्षक संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सुदाम वराट यांचा सत्कार जिल्हा पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष सुभाष गुंदेच्या यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# सुदाम वराट शिक्षकांना न्याय देतील

## जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष गुंदेचा

जामखेड - सुदाम वराट यांचे पत्रकारीतेबरोबरच शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम आहे. विद्यार्थांना घडविण्याचे काम ते करतात. नक्कीच शिक्षकांचे प्रश्न सोडवून शिक्षकांना न्याय देतील असा विश्वास अहिल्यानगर जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष गुंदेचा यांनी व्यक्त केला.

पत्रकार सुदाम वराट हे शिक्षकही आहेत त्यांची माध्यमिक शिक्षक संघटनेच्या जामखेड तालुकाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल जामखेड पत्रकार संघाच्या वतीने सत्कार आयोजित करण्यात आला होता. यावेळी दैनिक नवामराठा चे संपादक सुभाष गुंदेचा, सहसंपादक अनिकेत गुंदेचा, जामखेड पत्रकार संघाचे अध्यक्ष नासीर पठाण, उपध्याक्ष अशोक निमोणकर, संदीप भालेराव, सोहेल सय्यद, इंजिनिअर नासीर खान, प्राचार्य सादेक शेख, मयुर भोसले, पप्पू सय्यद, सोहेल सय्यद, मोहिउद्दीन तांबोळी, निलेश वनारसे, अशोक वीर उपस्थित होते.

नासीर पठाण म्हणाले की, सुदाम वराट यांनी पत्रकारीतेत जनसामान्यांच्या प्रश्नांला हात घालत न्याय मिळवून देणे कौतुकास्पद आहे. पत्रकारी प्रमाणेच शिक्षकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी ते तत्पर असतील असा ध्रुढ विश्वास पठाण यांनी व्यक्त केला.

शिक्षक संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सुदाम वराट यांचा सत्कार जिल्हाध्यक्ष सुभाष गुंदेच्या यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व शाल देऊन सत्कार करण्यात आला.

# नवीपेठ येथील श्रीराम मंदिरामध्ये १९ एप्रिल रोजी विराट हिंदू संमेलन

## मिरवणूक, व्याख्यानांचे आयोजन, सुरेश चव्हाणके व गोविंद शास्त्री जाटदेवळेकर महाराज यांची उपस्थिती





नगर - अहिल्यानगर शहराच्या मध्यवस्तीत कापड बाजार भागात १९ एप्रिल रोजी होणाऱ्या विराट हिंदू संमेलनाच्या निमित्ताने सायंकाळी ४.३० वाजता आडते बाजार येथील प्रभू श्रीराम मंदिर येथून शोभायत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. शोभा यात्रेचा मार्ग डाळ मंडई, तेली खुंट चौक, शहाजीराजे मार्ग, भिंगारवाला चौक, अर्बन बँक रोड, शहर सहकारी बँक येथे शोभा यात्रेचा समारोप होणार आहे. यात्रेत मंगल कलश घेऊन महिला तसेच पारंपारिक पोशाखामध्ये हिंदू समाज उपस्थित राहणार आहे. तसेच या मिरवणुकीमध्ये श्रीरामाची मूर्ती, स्वसंरक्षणासाठी लाठी, काठी व तलवारबाजी करणाऱ्या मुली व भगवे ध्वज, तसेच विविध महापुरुषांच्या वेशभूषा केलेली बालके हे मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. मिरवणुकीचा समारोप नवीपेठ येथील श्रीराम मंदिर येथे होणार आहे.

विराट हिंदू संमेलनाचे प्रमुख अतिथी प्रखर हिंदुत्ववादी वक्ते सुरेश चव्हाणके, पाथर्डी येथील संत हभप गोविंदशास्त्री मुकुंदकाका जाटदेवळेकर महाराज, प्रमुख वक्ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत कुटुंब प्रबोधन प्रमुख नरेश करपे हे आहेत.

हिंदू धर्म, परंपरा, संस्कृती आणि मूल्यांचे जतन व संवर्धन करण्याचा संदेश या व्यासपीठावरून दिला जाणार आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत संस्कृतीचे रक्षण आणि भावी पिढ्यांपर्यंत तिचा वारसा पोहोचवणे आवश्यक असल्याचे संमेलनाच्या आयोजकांनी सांगितले.

संमेलनाच्या माध्यमातून युवकांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव आणि देशभक्तीची भावना दृढ करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन राष्ट्रनिर्मितीत सक्रिय भूमिका बजावावी, यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.



परशुराम रेखी गुरुजी यांना वेदालंकार पदवीने गौरविण्यात आले.

# अध्यात्मिक प्रतिष्ठान वेद पाठशाळेतील विद्यार्थ्यांचा 'वेदालंकार' पदवीने सन्मान

नगर - विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे जिल्ह्यातील आळंदी येथे स्थित असलेल्या अध्यात्मिक प्रतिष्ठान वेद पाठशाळेत शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रदान सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी अहिल्यानगरमधील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत वेदालंकार ही मानाची पदवी प्राप्त केली. या सन्मान सोहळ्यात अहिल्यानगरचे पुत्र परशुराम रेखी गुरुजी यांना वेदालंकार पदवीने गौरविण्यात आले.

मुखेड येथील आदित्य जोशी यांनाही वेदालंकार पदवीने गौरविण्यात आले. या कार्यक्रमात श्रीमत् भागवत निरूपणकार वेदमूर्ती अशोकशास्त्री कुलकर्णी गुरुजी, वेदमूर्ती अतुलशास्त्री भगरे गुरुजी, वेदमूर्ती महेश रेखे गुरुजी तसेच दण्डक्रम पारायण करणारे वेदमूर्ती देवव्रत महेश रेखे गुरुजी उपस्थित होते.

# शिक्षकांनी गायलेल्या भीमगीतांनी डॉ. आंबेडकर जयंती साजरी

## समर्थ प्रशालेच्या सावेडीच्या चारही विभागांचा उपक्रम



सावेडीच्या श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला प्राथ., माध्य.व उच्च माध्य. व बालआनंदवनभुवन बालवाडी विभागाच्या शिक्षकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळा साजरा केला.

नगर - शिक्षकांनी गायलेली एकापेक्षा एक सरस भीमगीते, प्रबोधनपर फलक लेखन, महिला व्याख्यात्यांच्या व्याख्यानातून नव्याने उमगलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अहिल्यानगर व डॉ. आंबेडकर यांचा ऐतिहासिक लौकिक सहसंबंध अशा विविध उपक्रमांनी सावेडीच्या श्री समर्थ विद्यामंदिर प्रशाला प्राथ., माध्य.व उच्च माध्य. व बालआनंदवनभुवन बालवाडी विभागाच्या शिक्षकांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळा उंचीवर नेला. डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाचा शुभारंभ झाला.

प्रास्ताविकात प्राचार्या वसुधा जोशी यांनी नमूद केले की, आजच्या काळाचा विचार करून भारताचे राज्यघटनारुपी संविधान लिहिले. यातून त्यांची भारतीय समाजाविषयक भविष्यकालीन दूरदृष्टी दिसून येते.

शिक्षक बापूसाहेब गायकवाड यांनी बोल भिमाचे ध्यानी ठेवा, घरोघरी आंबेडकर व्हावा, बोध प्रत्येकाने घ्यावा, भिमाच्या सारखा बाळ जन्मा यावा या गीतातून रसिक प्रेक्षकांची मने जिंकली.

शिक्षक संकेत शिंदे यांनी राजा राणीच्या जोडीला, पाच मजली माडीला, आहे कोणाचे योगदान ? लाल दिव्याच्या गाडीला या भीमगीतातून रसिकांना डोलायला लावले.

शिक्षक भोराजी पथवे यांनी कष्ट केले माझ्या भिमाने, जातीपातीत वाटू नका रेया भीमगीतातून आर्त स्वर लावला.

शिक्षक सुनील रायकर यांनी महामानव या फक्त आठ-दहा शब्दांच्या कवितेतून डॉ.आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व प्रस्तुत केले.

प्रा. कल्पना साबळे यांनी कुणी नाही केलं- भिमानं केलं व माय, आमच्या हक्काचं लेखन व माय माझ्या भिमानं केलंहे सादर करण्याबरोबरच डॉ.आंबेडकर यांचा समाज सुधारणेचा विचार देखील व्याख्यानातून प्रस्तुत केला. व प्रशालेस ग्रंथ भेट दिला.

शिक्षिका अश्विनी जाधव यांनी डॉ.आंबेडकर यांचे शिक्षणातील योगदान या विषयावर व्याख्यान प्रस्तुत केले.

राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक डॉ.अमोल बागुल यांनी सूत्रसंचालनातून डॉ.आंबेडकर व अहिल्यानगर यांचा ऐतिहासिक लौकिकाचा ऋणानुबंध या विषयावर संशोधनपर संदर्भ मांडले.

मुख्याध्यापिका धनश्री गुंफेकर यांनी शिक्षकांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. कलाशिक्षक विवेक भारताल यांनी आकर्षक फलकलेखन केले. पर्यवेक्षक लक्ष्मीकांत कुलकर्णी यांनी आभार मानले. जयंती सोहळ्यासाठी चारही विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# अहिल्यानगर येथील चित्रकूट गुरूकुल आयोजित 'फाऊंडेशन बिल्डर पुरस्कार' वितरण सोहळा उत्साहात




चित्रकूट गुरूकुल आयोजित फाऊंडेशन बिल्डर पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात झाला.

नगर - चित्रकूट गुरूकुल आयोजित फाऊंडेशन बिल्डर अवार्ड २.० हा पुरस्कार सोहळा नुकताच पार पडला. शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान करणे, त्यांचे मनोबल वाढवणे आणि समाजात शिक्षकांच्या योगदानाबद्दल आदर निर्माण करणे या उद्देशाने हा सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मनपाचे अग्निशमन अधिकारी शंकर मिसाळ उपस्थित होते. त्यांनी आपत्कालीन व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करत सर्व शाळांनी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन चित्रकुट गुरूकुलचे संचालक संजय चव्हाण आणि प्राचार्या सारिका आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या कार्यक्रमात १०० हून अधिक शिक्षक आणि विविध शाळांचे मुख्याध्यापक सहभागी झाले होते. उपस्थित शिक्षकांना प्रेरणा देण्यासाठी प्रीतीज पाठशाळाच्या संस्थापक प्रीती मुथीयन यांनी लहान वयात वाचनाचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी मुलांमध्ये वाचनाची सवय लहानपणापासून रुजवण्याची गरज आणि त्याचे दीर्घकालीन फायदे यावर सविस्तर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाला वास्तूविशारद मयूर कोठारी तसेच बर्लिंग्टन पब्लिकेशन्स यांचे सहकार्य लाभले. हा कार्यक्रम शिक्षकांचा सन्मान करण्याबरोबरच शिक्षण क्षेत्रात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी आणि शिक्षकांना अधिक प्रेरित करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## क्वांटम डेटाबाबत क्रांतिकारी पाऊल

नवीन संशोधनानुसार, 'टाईम क्रिस्टल्स' क्वांटम कंप्युटिंगमधील डेटा साठवणुकीसाठी मदत करू शकतात, ज्यामुळे डेटा साठवणूक सध्याच्या मिलिसेकंदांच्या तुलनेत मिनिटांपर्यंत टिकू शकेल, जी क्वांटम डेटा टिकवण्याच्या क्षमतेमध्ये एक मोठी सुधारणा आहे. नवीन संशोधनात, शास्त्रज्ञांनी टाईम क्रिस्टल्स यांत्रिक लहरींशी कसा संवाद साधतात यावर प्रयोग केले. टाईम क्रिस्टल्स अत्यंत नाजूक मानले जात असले, तरी संशोधकांनी दाखवून दिले की ते टाईम क्रिस्टल्सला यांत्रिक पृष्ठभागाच्या लहरींशी जोडले जाऊ शकतात आणि असे केल्याने ते नष्ट होत नाहीत. या अभ्यासाचे सह-लेखक आणि फिनलंडमधील आल्टो विद्यापीठाचे अकादमी रिसर्च फेलो जेरे मॅकिनन यांनी सांगितले की, 'माझ्यासाठी हा सर्वात मनोरंजक भाग आहे. तुम्ही टाईम क्रिस्टल्सला दुसऱ्या प्रणालीशी महत्त्वपूर्ण



मार्गाने जोडू शकता आणि टाईम क्रिस्टल्सच्या नैसर्गिक मजबुतीचा उपयोग करू शकता.'

पारंपरिक स्फटिकासारख्या संरचनांमध्ये अणू किंवा रेणूंची अवकाशात नियमित मांडणी असते, परंतु, टाईम क्रिस्टल्स नियमित कालावधीनंतर आपल्या विशिष्ट स्थितीत परत येतात. उदाहरणार्थ, हे लंबकासारखे नाही, जिथे दोलनाची वारंवारता केवळ दोलायमान शक्तीच्या वारंवारतेचे प्रतिबिंब असते. टाईम क्रिस्टलच्या बाबतीत, कृती सुरू करण्यासाठी काही प्रारंभिक प्रेरणा आवश्यक असली, तरी ही नियमितता आपोआप प्राप्त होते, त्या विशिष्ट वारंवारतेने कशाद्वारेही ती चालवली जात नाही. २०१२ मध्ये 'टाईम क्रिस्टल्स'ची संकल्पना मांडल्यापासून, वेगवेगळ्या सेटअपमध्ये टाईम क्रिस्टल्स म्हणून काम करणाऱ्या संरचनांची नोंद झाली आहे. मॅकिनन आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी त्यांचे टाईम क्रिस्टल्स 'मॅग्नॉन्स' नावाच्या अर्ध-कणांवर आधारित केले. मॅग्नॉन्स हे 'स्पिन' नावाच्या क्वांटम गुणधर्माच्या मूल्यामध्ये एकत्रित लहरी असतात. त्यांनी 'सुपरफ्लुइड हीलियम-३' मध्ये मॅग्नॉन्स तयार केले. या हीलियममध्ये केंद्रकांमध्ये दोन प्रोटॉन आणि फक्त एक न्यूट्रॉन असतो, ज्यामुळे केंद्रकातील कणांचे स्पिन (फिरणे) रद्द होऊ शकत नाही. हीलियम-३ ला क्रायोजेनिक तापमानाला (अतिशीत तापमान) थंड केल्यावर, अणूंच्या गतीमुळे ते एकमेकांकडे आकर्षित होतात आणि कूपर जोड्या नावाच्या अर्ध-कणांमध्ये पुनर्रचित होतात. कूपर जोड्या म्हणून, हे अर्ध-कण केवळ एकाच उपलब्ध क्वांटम स्थितीपर्यंत मर्यादित राहतात, ज्यामुळे द्रवाची श्यानता दूर होते. सुपरफ्लुइड हीलियम-३ ला यांत्रिक पृष्ठभागाच्या लहरीने हलवल्यास त्यावर एक मनोरंजक परिणाम होतो, जो पृष्ठभागाचा कूपर जोड्यांच्या स्पिन आणि ऑर्बिटल कोनीय संवेगावर होणाऱ्या प्रभावामुळे होतो. हे गुणधर्म सुपरफ्लुईडचे वैशिष्ट्य दर्शवण्यासाठी वापरले जातात.

## अंतराळात अडकलेले अंतराळवीर परतले!

एका अनपेक्षित घटनेमुळे, तीन चिनी अंतराळवीर, ज्यांना टायकोनॉटसब म्हणतात, अंतराळात तात्पुरते अडकले होते. पृथ्वीवर परतण्याच्या काही तास आधी, त्यांच्या रिटर्न कॅप्सूलला 'अंतराळ कचऱ्याच्या' एका तुकड्याचा धक्का बसल्याची माहिती मिळाली आहे. नेमके काय घडले, याचा अधिकारी तपास करत होते. मात्र, या यानाला किती नुकसान झाले आहे किंवा अंतराळवीर कधी पृथ्वीवर परततील, याबाबत अद्याप कोणतीही माहिती उपलब्ध होत नव्हती. पण नुकतेच या तीन्ही अंतराळवीरांना पृथ्वीवर आणण्यात यश आले आहे.

वांग जी, चेन झोंग रुई आणि चेन डोंग या तीन टायकोनॉटस्चा शेंझोऊ-२० चमू २४ एप्रिलपासून चीनच्या तिआंगॉन्ग स्पेस स्टेशनवर वास्तव्यास होते. ३१ ऑक्टोबरला स्पेस स्टेशनवर आलेल्या शेंझोऊ-२१ चमू सोबत हस्तांतरण प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर, हा चमू बुधवार, ५ नोव्हेंबर रोजी पृथ्वीवर परतणार होता. मात्र, बुधवारी सकाळी १०.३० वाजता (स्थानिक वेळेनुसार), चायना मॅन्ड स्पेस एजन्सीच्या प्रतिनिधींनी चिनी सोशल मीडिया साईट वेइबोवर एका निवेदनाद्वारे अंतराळवीरांचा परतीचा प्रवास स्थगित केल्याची घोषणा केली.

विलंब होण्याचे कारण देताना प्रतिनिधींनी सांगितले की, 'क्रूच्या रिटर्न कॅप्सूलवर अंतराळ ढिगाऱ्यातील लहान वस्तूचा आघात झाल्याचा संशय आहे.' यानंतर अंतराळ स्थानकावर असलेल्या सहाही टायकोनॉटस्चे आरोग्य आणि सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आघात विश्लेषण आणि धोका मूल्यांकन सुरू आहे, असे एजन्सीने स्पष्ट केले आहे. या घटनेबद्दल इतर कोणतेही तपशील अद्याप जाहीर करण्यात आलेले नाहीत. संभावित नुकसान झालेले हे अंतराळयान अजूनही तिआंगॉन्ग स्पेस स्टेशनला जोडलेले असण्याची शक्यता आहे. हे यान तीन वेगळ्या भागांचे बनलेले आहे: पॉवर आणि प्रॉपल्शन मॉड्यूल, क्रू राहण्याची जागा आणि पॅराशूट-सहाय्यित रिटर्न मॉड्यूल, असे सांगण्यात आले होते.

जर या यानाचा कोणताही भाग



असुरक्षित आढळला असता तर अंतराळवीरांशिवाय ते यान पृथ्वीवर परतण्यासाठी अंतराळ स्थानकावरून बाहेर काढले जाईल.


चीन मानवयुक्त अंतराळ संस्था यांच्या माहितीनुसार शुक्रवारी दुपारी चार वाजून चाळीस मिनिटांनी उत्तर चीनमधील इनर मंगोलिया स्वायत्त प्रदेशातील डोंगफेंग लँडिंग साइटवर परत येणारे कॅप्सूल यशस्वीपणे उतरले आणि सायंकाळी पाच वाजून एकवीस मिनिटांपर्यंत तिघेही अंतराळवीर कॅप्सूलमधून बाहेर आले.

कक्षेत सलग दोनशे चार दिवस वास्तव्य केल्यानंतर तिघांचीही तब्येत उत्तम असून ही परतण्याची मोहीम पूर्णतः यशस्वी ठरली, असे संस्थेने सांगितले. आता हे अंतराळवीर वैद्यकीय निरीक्षणासाठी विलगीकरण कालावधीत राहतील. या काळात त्यांची सविस्तर वैद्यकीय तपासणी आणि आरोग्य मूल्यमापन केले जाईल.

## दूरच्या ग्रहाच्या वातावरणाचा त्रिमितीय नकाशा!

शास्त्रज्ञांनी प्रथमच एका दूरच्या ग्रहाच्या वातावरणाचा त्रिमितीय (३ ऊ) नकाशा तयार केला आहे. यासाठी, संशोधकांनी जेम्स वेब स्पेस टेलिस्कोपमधून मिळालेला डेटा आणि 'ग्रहण मॅपिंग' नावाचे तंत्र वापरले. पृथ्वीपासून सुमारे ४०० प्रकाशवर्षे दूर असलेल्या 'वास्प-१८ बी' (WASP-18 b) नावाच्या वायू-महाकाय बाह्यग्रहाच्या वातावरणात संशोधकांना वेगवेगळ्या तापमान क्षेत्रांचा शोध लागला आहे.

'नेचर ॲस्ट्रॉनॉमी' जर्नलमध्ये २८ ऑक्टोबर रोजी प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, हीच प्रक्रिया आता शास्त्रज्ञांना इतर दूरच्या ग्रहांवरील तापमान भिन्नता आणि ढगांची रचना यांचा नकाशा तयार करण्यासाठी लवकरच मदत करू शकते. 'ग्रहण मॅपिंगमुळे आपण असे बाह्यग्रह पाहू शकतो जे आपण थेट पाहू शकत नाही, कारण त्यांचे मूळ तारे खूप तेजस्वी असतात. या दुर्बिणीने आणि या नवीन तंत्राद्वारे, आपण आपल्या सूर्यमालेतील



शेजाऱ्यांप्रमाणेच बाह्यग्रहांना समजून घेण्यास सुरुवात करू शकतो,' असे या अभ्यासाचे सह-लेखक आणि कॉर्नेल विद्यापीठातील संशोधक रायन चॅलेनर यांनी एका निवेदनात सांगितले.

'वास्प-१८ बी' ग्रहाचे वस्तुमान गुरू ग्रहापेक्षा सुमारे १० पट अधिक आहे. हा ग्रह त्याच्या ता?याशी भरती-ओहोटीने बद्ध आहे. याचा अर्थ ग्रहाची एक बाजू सतत ताऱ्याकडे असते, तर दुसरी बाजू नेहमी अंधारात राहते. जेव्हा एखादा ग्रह त्याच्या ताऱ्याच्या मागे जाण्यास सुरुवात करतो, तेव्हा तारा ग्रहाद्वारे परावर्तीत होणारा प्रकाश अधिकाधिक रोखतो. आपल्या सूर्यमालेतून पाहिल्यास, ग्रह पूर्णपणे अस्पष्ट होईपर्यंत हे घडते.

'ग्रहण मॅपिंग' हे तंत्र या हळूहळू होणाऱ्या बदलाचा फायदा घेते. ग्रहाचा प्रकाश जसजसा अस्पष्ट होतो आणि पुन्हा दिसू लागतो, तसतसा त्यात होणारा बदल मोजून, शास्त्रज्ञ ग्रहाच्या वातावरणातील वेगवेगळ्या प्रदेशांचे आणि उंचीचे तापमान काढू शकतात. या नवीन अभ्यासात, शास्त्रज्ञांनी 'वास्प-१८ बी' च्या वातावरणाचा अधिक तपशीलवार थ्रीडी नकाशा तयार करण्यासाठी वेगवेगळ्या तरंगलांबीचा प्रकाश वापरून, मागील द्विमितीय तापमान नकाशावर अधिक माहिती मिळवली.

## बागेत सापडला सुवर्ण खजिना

कधी कधी खोदकाम करताना अपघातानेच जुन्या काळात पुरून ठेवलेला सोन्याचा खजिना सापडल्याच्या घटना जगभर घडलेल्या आहेत. काही ठिकाणी मेटल डिटेक्टरच्या साहाय्याने मुद्दामच असा शोधही घेतला जात असतो. आता फ्रान्समध्ये एका माणसाला आपल्या घराच्या बागेतच खोदकाम करीत असताना सोन्याचा खजिना आढळून आला आहे. त्याची किंमत भारतीय चलनात तब्बल सात कोटी रुपये आहे!

फ्रान्समधील ही व्यक्ती आपल्या घराच्या बागेत खोदकाम करत होती. तेवढ्यात त्याला हा सोन्याचा मोठा खजिना आढळला. त्याला जमिनीत अनेक पिशव्या पुरून ठेवलेल्या आढळून आल्या, या पिशव्यांमध्ये सोन्याची बिस्किटं आणि नाणी आढळली. हा खजिना सापडल्याने ही व्यक्ती क्षणात मालामाल झाली आहे. हे संपूर्ण सोनं आता त्याच्या मालकीचं झालं आहे. तपास केल्यानंतर अधिकाऱ्यांनी हा खजिना त्या व्यक्तीच्या मालकीचा असल्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे अचानक ही व्यक्ती श्रीमंत झाली आहे.

याबाबत, स्थानिक अधिकाऱ्यांनी सांगितलं की, या व्यक्तीला त्याच्या घराच्या



बागेत स्विमिंग पूल बांधायचा होता. त्यामुळे त्याने बागेत खोदकाम सुरू केले. याचवेळी त्या व्यक्तीला जमिनीत काहीतरी दिसून आलं. तिथे अनेक पिशव्या पुरून ठेवलेल्या होत्या. जेव्हा त्याने या पिशव्या बाहेर काढल्या आणि उघडल्या तेव्हा त्याला आनंदाचा धक्काच बसला. कारण, या पिशव्यांमध्ये त्याला सोन्याचा खजिना दिसून आला. या व्यक्तीला मिळालेल्या या सोन्याच्या खजिन्याची किंमत ७,००,००० यूरो म्हणजेच भारतीय चलनात तब्बल सात कोटी रुपये आहे.

## सापडला १३७ कॅरेटचा शाही हिरा

युरोपमधील दोन सर्वात शक्तिशाली राजघराण्यांच्या मालकीचा असलेला आणि 'गायब' झाल्याचे मानला जात असलेला, गोल्फ बॉलच्या आकाराचा 'फ्लोरेन्टाईन हिरा' एका धक्कादायक ठिकाणी सापडला आहे. मेडिसी आणि हॅब्सबर्ग राजघराण्यातील हा १३७ कॅरेटचा 'फ्लोरेन्टाईन हिरा' कॅनडातील एका बँक व्हॉल्टमध्ये सापडला, अशी माहिती 'न्यूयॉर्क टाईम्स'ने दिली आहे.

दशकांपासून या मौल्यवान रत्नाच्या 'गहाळ' होण्याबद्दल अनेक अटकळी लावल्या जात होत्या. लोकांना वाटत होते की, हा हिरा हरवला किंवा चोरीला गेला आहे. पण, हॅब्सबर्ग कुटुंबाने खुलासा केला की, हा हिरा दुस?या महायुद्धापासून एका तिजोरीत सुरक्षित ठेवलेला होता. या हिऱ्याचा इतिहास १९१८ मध्ये, पहिल्या महायुद्धाच्या शेवटी, जेव्हा ऑस्ट्रियाचे सम्राट चार्ल्स पहिला यांची राजेशाही संपुष्टात आली, तेव्हा सुरू झाला.

चार्ल्स पहिल्यांनी जेव्हा विजनवासात गेले, तेव्हा त्यांनी हा हिरा आणि शतकानुशतके जुनी इतर रत्ने संरक्षणासाठी स्वित्झर्लंडला पाठवली. चार्ल्स पहिल्यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी महाराणी झिटा ऑफ बोर्बन-पार्मा आणि त्यांची मुले स्पेन आणि नंतर बेल्जियमला स्थलांतरित झाली. १९३८ मध्ये नाझींनी ऑस्ट्रिया ताब्यात घेतल्यावर, झिटा आणि तिचा मोठा मुलगा, युवराज ओटो वॉन हॅब्सबर्ग,



ॲडॉल्फ हिटलरच्या वाढत्या सत्तेला तीव्र विरोध करत होते. दोन वर्षांनंतर, झिटा यांना पुन्हा युरोप सोडून अमेरिकेकडे पळून जाण्यास भाग पाडले गेले.

कुटुंबातील सदस्यांनी सांगितले की, त्यांनी हे दागिने एका लहान पुठ्ठ्याच्या सुटकेसमध्ये ठेवले होते. अमेरिकेच्या मदतीने हे कुटुंब कॅनडामध्ये पोहोचले आणि क्यूबेकमध्ये स्थायिक झाले. चार्ल्स पहिल्यांचे नातू, कार्ल वॉन हॅब्सबर्ग-लोथरिंगेन यांनी सांगितले, 'माझ्या आजीला (झिटा) तिथे खूप सुरक्षित वाटले. त्यांना शेवटी श्वास घेता आला. मला वाटते की त्या टप्प्यावर ती छोटी सुटकेस बँक व्हॉल्टमध्ये गेली आणि तिथेच राहिली. आणि त्या बँक व्हॉल्टमध्ये तो हिरा तसाच राहिला.'

झिटा १९५३ मध्ये युरोपला परतल्या आणि १९८९ मध्ये वयाच्या ९६ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांनी आयुष्यभर हा प्रतिष्ठित हिरा कॅनडामध्ये ठेवला, ही गोष्ट जगाला माहीत नव्हती. हॅब्सबर्ग-लोथरिंगेन यांनी सांगितले की, त्यांच्या आजीला हिऱ्याचे महत्त्व माहीत होते.

'कौटुंबिक महत्त्वाच्या वस्तूंपैकी काही वस्तू मी वाचवल्या याचा तिला खूप आनंद होता,' असे ते म्हणाले. या हिऱ्याची सत्यता ख्रिस्तोफ कोचेर्ट यांनी प्रमाणित केली. त्यांच्या फर्मने एकेकाळी ऑस्ट्रियाच्या शाही न्यायालयाचे ज्वेलर्स म्हणून काम पाहिले होते. कोचेर्ट यांनी सांगितले की, हिऱ्याची कटिंग नमुना ऐतिहासिक स्रोतांमध्ये दर्शविलेल्या चित्रांशी जवळजवळ जुळतो आणि इलेक्ट्रॉनिक टेस्टर वापरूनही त्याची सत्यता निश्चित करण्यात आली.


हॅब्सबर्ग कुटुंबाच्या मालकीचा होण्यापूर्वी हा हिरा मूळतः फ्लोरेन्सच्या मेडिसी कुटुंबाचा होता. फ्रान्सिस स्टीफन आणि ऑस्ट्रियाची आर्चडचेस मारिया थेरेसा यांच्या विवाहाद्वारे तो १८ व्या शतकात हॅब्सबर्ग राजघराण्यात दाखल झाला. हॅब्सबर्ग कुटुंब आता या हिऱ्याचे कॅनडामध्ये प्रदर्शन करण्याची इच्छा व्यक्त करत आहे, ज्या देशाने महाराणीला आणि तिच्या मुलांना आश्रय दिला, त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा एक भाग आहे.

## तांदुळाचा प्रतिकिलो भाव साडे बारा हजार रुपये!

भारतीय आहारातील तांदळाचे महत्त्व अनमोल आहे. कारण, तो शरीराला ऊर्जा आणि आवश्यक पोषक तत्त्वे देतो; पण जगात असे एक तांदळाचे वाण आहे, ज्याची किंमत ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल. कारण, हा तांदूळ जगातला सर्वात महागडा तांदूळ आहे. त्याची किंमत प्रति किलो १२ हजार ५०० रुपये आहे. हा तांदूळ कुठे मिळतो आणि त्याची वैशिष्ट्ये काय आहेत, हे आपण जाणून घेणार आहोत.

हा तांदूळ जपानमधील कोशिहिकारी प्रदेशात पिकवला जातो. त्याचे नाव किनमेमाई प्रीमियम असे आहे. या ठिकाणची विशिष्ट माती आणि हवामान या तांदळाच्या उत्पादनासाठी अत्यंत अनुकूल मानले जाते. या तांदळाचे उत्पादन अतिशय कमी प्रमाणात होते. त्याची मागणी आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचंड आहे, ज्यामुळे त्याची किंमत खूप जास्त आहे. जपान हा तांदूळ जगाला पुरवतो. शिवाय उत्पादन कमी असल्याने आपोआप त्याची किंमतही जास्त आहे.

किनमेमाई प्रीमियम तांदळाची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी तो एका विशेष प्रक्रियेतून जातो. त्याची निवड हाताने केली जाते आणि त्याची पृष्ठभागावरील स्टार्च आणि कोंडा काढून टाकण्यासाठी विशेष प्रक्रिया केली जाते. यामुळे हा तांदूळ शिजवण्यापूर्वी धुण्याची गरज नसते. शिवाय तो आरोग्यासाठी ही चांगला समजला जातो. त्यातून अनेक पौष्टिक गोष्टी शरीराला मिळतात. तसा हा



तांदूळ दुर्मीळ म्हणावा लागेल. या तांदळात लिपोपॉलीसेकेराइड्स (एलपीएस) नावाचे खास मिश्रण असते. एलपीएस रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्यास मदत करते आणि अनेक आजारांपासून शरीराचे संरक्षण करते, असा दावा केला जातो. टोयो राइस कॉर्पोरेशनचे अध्यक्ष केइजी सायका यांच्या माहितीनुसार, २०१६ मध्ये जेव्हा 'किनमेमाई प्रीमियम' लाँच करण्यात आला, तेव्हा ८४० ग्रॅम पॅकेटची किंमत ९,४९६ जपानी येन म्हणजे भारतीय चलनात ५,४९० रुपये इतकी होती. आता प्रति किलो त्याची किंमत १२,५५७ रुपयांपर्यंत पोहोचली आहे. ज्यामुळे तो जगातील सर्वात महागडा तांदूळ ठरला आहे.

## चांदोबा पृथ्वीजवळ आल्यास...

अमेरिकेची अंतराळ संशोधन संस्था 'नासा' पुन्हा एकदा मानवाला चंद्रावर उतरवण्याची तयारी करत आहे. 'नासा'चे आर्टेमिस मिशन फेब्रुवारी २०२६ मध्ये लॉन्च होऊ शकते. जगभरातील देश चंद्रावर परत जाण्याची योजना आखत आहेत. पृथ्वीचा एकमेव नैसर्गिक उपग्रह असलेल्या चंद्राचे मानवाच्या दृष्टीने बरेच महत्त्व आहे. मात्र, हा चांदोमामा पृथ्वीच्या आणखी जवळ आला तर? त्याचे पृथ्वीपासूनचे योग्य अंतरच आपल्यासाठी योग्य आहे, तो आणखी जवळ आल्यास विनाश होऊ शकतो,



असे संशोधक सांगतात.


चंद्र पृथ्वीवर जीवन टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. त्याचे गुरुत्वाकर्षणीय आकर्षण पृथ्वीच्या हवामानाला स्थिर ठेवण्यास मदत करते. चंद्राचे गुरुत्वाकर्षण बल पृथ्वीचा अक्षीय कल स्थिर ठेवते.

या स्थिरतेमुळेच पृथ्वीवर दीर्घकाळ स्थिर हवामान राहते आणि हंगामी बदल देखील नियमितपणे होतात. चंद्राशिवाय पृथ्वीचा अक्षीय कल अनियमितपणे डळमळेल. यामुळे अति टोकाचे हवामान बदल होतील, जे पर्यावरण प्रणालीला उद्ध्वस्त करू शकतात आणि जीवन टिकवून ठेवणे अत्यंत कठीण करतील. चंद्राचे गुरुत्वाकर्षण पृथ्वीच्या पाण्यावर जोर लावून समुद्रात भरती-ओहोटी निर्माण करते. या भरती-ओहोटी सागरी थरांना मिसळून पोषक तत्त्वांचे वितरण करतात आणि पाण्याला ऑक्सिजन पुरवतात, ज्यामुळे सागरी जीवनासाठी आवश्यक संतुलन राखले जाते. प्रवाळ आणि स्थलांतरित पक्ष्यांसारखे सागरी आधारावर जगणारे काही जीव त्यांचे प्रजनन चक्र चंद्राच्या कलांशी जोडतात, जे चंद्राचा जैविक प्रभाव दर्शवते. चंद्र पृथ्वीपासून ३,८४,४०० किलोमीटर दूर आहे आणि हे अंतर अगदी योग्य आहे. जर चंद्र किंचितही जवळ आला, तर भरतीचे बल खूप वाढेल. यामुळे अतिविशाल भरती-ओहोटी येतील, ज्यामुळे किनारी भागांमध्ये नियमितपणे पूर येतील. तसेच, पृथ्वीच्या फिरण्याची गती हळू होईल. जर चंद्र अधिक दूर गेला, तर भरती-ओहोटी कमजोर होईल. यामुळे सागरी पाण्याचे अभिसरण थांबेल आणि सागरी जीवनाचे मोठे नुकसान होईल.

## डिट्टो माणसासारखाच रोबोट!

एक काळ असा होता, जेव्हा लोक रोबोला फक्त चित्रपटांमध्ये पाहून ती निव्वळ एक कल्पना आहे, असे समजत असत. पण आता ते पूर्णपणे सत्यात उतरत आहे. चीनमधील इलेक्ट्रिक व्हेईकल कंपनी 'एक्सपेंग'ने आपला नवीन 'आयर्न ह्युमनॉईड रोबो' लाँच केला. हा रोबोट तब्बल ८० टक्के मानवासारखा आहे. वास्तविक पाहता, हा दिसण्यात आणि चालण्यात अगदी माणसासारखाच भासतो. 'एक्सपेंग'ने या रोबोला त्यांच्या २०२५ एआय डे कार्यक्रमात सादर केले, जिथे त्याने व्यासपीठावर मानवांप्रमाणे कॅटवॉक करून सर्वांना चकित केले. या रोबोमधील आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) आणि बायोनिक तंत्रज्ञान यामुळे भविष्यातील जगाची झलक दिसते.

'एक्सपेंग' चा नवीन 'आयर्न रोबो' पूर्णपणे मानवासारख्या डिझाईनवर आधारित आहे. याची उंची १७८ सेमी आणि वजन ७० किलोग्रॅम आहे. कंपनीचे चेअरमन आणि सीईओ हे श्याओपेंग यांच्या मते, रोबोची चाल माणसांसारखी बनवण्यासाठी अभियंत्यांनी रोबोच्या पायाच्या बोटांमध्ये पॅसिव्ह मुव्हमेंट सिस्टीम जोडली आहे. यामुळे त्याची चाल हलकी आणि संतुलित वाटते. यामध्ये बायोनिक स्पाईन (लवचिक पाठीचा कणा), लवचिक स्नायू आणि



लवचिक त्वचा देखील देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, रोबोच्या डोक्यावर थ्रीडी कर्व्हड डिस्प्ले आहे, ज्यामुळे तो भावना दर्शवू शकतो.

या रोबोच्या हातांमध्ये '२२ डिग्री ऑफ फ्रीडम' नावाच्या तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. यामुळे तो माणसांप्रमाणे लवचिक आणि नैसर्गिक पद्धतीने हालचाल करू शकतो.

आयर्न रोबोला केवळ मानवी शरीरच नाही, तर जणू काही मानवी मेंदूही देण्यात आला आहे. या रोबोमध्ये 'एक्सपेंग'च्या 'व्हिजन-लँग्वेज-ॲक्शन (व्हीएलए) मॉडेलची दुसरी पिढी वापरली आहे. कंपनीने यात स्वतःच्या तीन ट्युरिंग एआय चिप्सचा वापर केला आहे. या चिप्सच्या मदतीने रोबोला २,२५० टॉप्स इतकी प्रोसेसिंग पॉवर मिळते.


यामुळे 'आयर्न रोबो' संवाद साधणे, चालणे, वस्तू ओळखणे आणि संवाद साधणे यांसारखी कठीण कामे करू शकतो. या रोबोमध्ये सॉलिड स्टेट बॅटरी वापरली आहे. 'एक्सपेंग'चे म्हणणे आहे की, 'आयर्न रोबो' केवळ चांगल्या प्रकारे चालू शकत नाही, तर तो माणसांशी संवाद साधू शकतो आणि त्यांच्यासोबत मिळून काम करण्यासही सक्षम आहे. 'एक्सपेंग'चा हा 'आयर्न रोबो' सुरुवातीला व्यावसायिक क्षेत्रात वापरण्यासाठी बनवला जाईल. कंपनीने रोबोसोबतच त्याचे सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट किट देखील लाँच केले आहे. आता जगभरातील डेव्हलपर्स या रोबोटसाठी अ?प्लिकेशन्स तयार करू शकतील. कंपनीने सांगितले आहे की, या रोबोचे पुढील वर्षापासून मोठ्या प्रमाणावर उत्पादन सुरू होईल.

### स्व.अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ नगरमध्ये

# १९ ते २१ एप्रिल दरम्यान डॉ. कुमार विश्वास यांच्या 'अपने-अपने राम' संगीतमय रामकथेचे आयोजन




नगर – कवी आणि रामकथाकार डॉ. कुमार विश्वास यांच्या 'अपने–अपने राम' या संगीतमय रामकथेचे १९ ते २१ एप्रिल दरम्यान दररोज सायंकाळी ६ ते ९ यावेळेत अहिल्यानगर शहरातील आनंदधाम रोड वरील राष्ट्रीय पाठशाळेच्या प्रांगणात आयोजन करण्यात आले आहे. काका ट्रस्ट संस्थेच्या वतीने स्व.अरुणकाका जगताप यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त याचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाची तयारी सचिन जगताप व आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्णत्वास येत आहे. भाविकांसाठी हा रामकथेचा सोहळा खुला आहे, अशी माहिती ट्रस्टचे राजेश भंडारी यांनी दिली.

रामकथा सोहळ्याची अधिक माहिती देताना नगरसेवक विकी जगताप म्हणाले, लोकप्रिय असलेले डॉ. कुमार विश्वास यांच्या रसाळ वाणीतून श्रीराम कथेची दुर्लभ पर्वणी नगरकरांना प्राप्त होणार आहे. या सोहळ्यासाठी सहकार सभागृहा समोरील राष्ट्रीय पाठशाळेच्या प्रांगणात जर्मन हँगर पद्धतीचा वॉटर प्रुफ २०० फुट बाय ५०० फुटाचा मंडप उभारण्यात आला आहे. या मंडपात हजारो भाविकांची आसन व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच आकर्षक सजावट असलेले व्यासपीठ उभारण्यात आले आहे. मंडपात लाईट, स्पीकर व ठिकठिकाणी एलईडी वॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच कार्यक्रमस्थळी तातडीच्या वैद्यकीय उपचार, रुग्णवाहिका, अग्निशमन वाहन याचबरोबर पिण्याचे पाणी, स्वच्छतागृह व्यवस्थेसह इतर आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भाविकांच्या दुचाकी व चारचाकी वाहनांच्या पार्किंगची सुटसुटीत व्यवस्था जवळच करण्यात आली आहे.

गणेश गोंडाळ म्हणाले, स्व.अरुणकाका यांनी जीवनात कायम अन्न दानाला महत्व दिले होते. त्यांच्या पश्चात हा वारसा पुढे चालवत आहोत. ट्रस्टच्या वतीने तीन दिवसीय राम कथेसाठी आलेल्या हजारो भाविकांची दररोज महाप्रसादाची सोय मुख्य मंडपा शेजारीच करण्यात आली आहे. यासाठी स्वतंत्र मोठ्या मंडपाची व्यवस्था करण्यात आला आहे.

शशीकांत घीगे यांनी सांगितले की, कुमार विश्वास हे त्यांच्या देश व भक्तिमय कवितांसाठी लोकप्रिय असून त्यांनी रामकथेच्या माध्यमातून त्यांनी देशवासीयांच्या हृदयात स्थान निर्माण केले आहे. त्यामुळे कुमार विश्वास यांची रामकथेचा कार्यक्रम प्रत्यक्ष पाहणे, ऐकणे आणि अनुभवणे हा एक अद्भुत अनुभव नगरच्या भाविकांसाठी ठरणार आहे.

सोहळ्यात सहभागी व्हावे व तिन्ही दिवस महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टचे अनिल मुरकुटे, अजित जगताप व अनुप काळे यांनी केले आहे.

# अभिषेक कळमकर यास न्यायालयासमोर हजर होण्याबाबतचा जाहिरनामा प्रसिध्द



नगर – तरुणीला नोकरी लावण्याचे आमिष दाखवत अत्याचार केल्याच्या गुन्ह्यात आरोपी असलेला माजी महापौर अभिषेक कळमकर यास तातडीने प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट नं. ३ येथे हजर होण्याचे आदेश न्यायालयाने काढले असून त्याबाबतचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे.

कळमकर विरोधात शिरूर येथील तरुणीच्या फिर्यादी वरून फेब्रुवारी मध्ये एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झालेला आहे. तेव्हापासून तो फरार आहे. तो मिळुन येत नसल्याने त्याचेविरुध्द भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ७५ प्रमाणे स्टँडिंग वॉरंट काढण्यात आले होते. सदर स्टँडीग वॉरंट अहिल्यानगर जिल्हा, तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यामध्ये पाठवुन आरोपीचा शोध घेण्यात आला परंतु तो मिळुन आला नाही. त्यानंतर आरोपीविरुध्द भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ८४ प्रमाणे कार्यवाही होणेबाबत न्यायालयास पत्रव्यवहार करण्यात आला असुन न्यायालयाने आरोपीस हजर होणेबाबत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ८४ प्रमाणे जाहिरनामा काढुन तो सार्वजनिक ठिकाणी दर्शनिय भागामध्ये प्रसिध्द करणेबाबत आदेशीत केलेले आहेत.

न्यायालयाने दिलेल्या जाहिरनाम्यामध्ये आरोपी अभिषेक बाळासाहेब कळमकर (रा. भुतकरवाडी चौक, सावेडी) यास तात्काळ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी कोर्ट नं. ३ यांचेसमक्ष हजर होणेबाबत आदेश दिलेले असुन सदर आरोपी न्यायालयासमोर हजर न राहिल्यास त्यास फरार आरोपी म्हणुन घोषीत करण्यात येणार असलेबाबत नमुद केलेले आहे. वर नमुद गुन्ह्यातील आरोपी अभिषेक कळमकर यास न्यायालयासमक्ष हजर होणेबाबत आवाहन करण्यात येत असुन आरोपी हजर न झाल्यास त्याचे संपत्ती जप्तीची कार्यवाही करण्यात येणार आहे. असे या जाहीरनाम्यात म्हंटले आहे.

# शंकर महाराज पालखी सोहळ्याचे १८ एप्रिल रोजी होणार प्रस्थान

नगर – सद्गुरू शंकर महाराज समाधी सोहळ्यानिमित्ताने अहिल्यानगर ते धनकवडी (पुणे) पायी पालखी दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी शंकरलिला परिवाराचे केडगाव येथील सद्गुरू विजयनाथ केदारी महाराज यांच्या मार्गदर्शनात १८ एप्रिल रोजी निघत आहे. ही यात्रा २४ एप्रिलपर्यंत होणार आहे. यावर्षी या पालखीचे हे नववे वर्ष आहे, अशी माहिती भक्तमंडळीकडून देण्यात आली.

''तुम्हा पहाणे तुम्हांस स्मरणे घेणे दर्शन भाग्यविण, या गोष्टी सार्या येतीन घडून धरले आम्ही भावे तुमचे जगी घट्ट चरण सोडणार नाही. कधी आम्ही आले जरी मरण'' अशा भावनेतून ही भक्तमंडळी या यात्रेस मोठ्या संख्येने निघाली आहेत. ही पायी पालखी अहिल्यानगर, चास, सुपा, शिरूर, रांजणगाव गणपती, कोंढापुरी, वाघोली, चंदननगर, हडपसर बायपास मार्गे श्री सद्गुरू शंकर महाराज मठ, धनकवडी (पुणे) येथे पोहोचणार आहे.

पालखीचा कार्यक्रम याप्रमाणे : १८ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता श्रीस्वामी समर्थ मंदिर, डी. एड्. कॉलेज, दिल्लीगेट येथून प्रस्थान करणार आहे. दिल्लीदरवाजा मार्गे चौपाटी कारंजा, दत्त मंदिर, चितळे रोड येथून तुळजाभवानीमाता मंदिर, सबजेल चौक, केडगाव येथे भंडारी यांच्याकडे भोजन व मुक्काम.

अक्षय्यतृतीया, १९ एप्रिल रोजी सकाळी ६ वा. केडगाव मार्गे, कामरगांव, भंडारी परिवाराकडून भोजन आणि श्री. जंगम यांच्याकडे विश्रांती.

२० एप्रिल रोजी वाघुंडे येथून प्रस्थान एमआयडीसी, जातेगाव मार्गे वाडेगव्हाणला दुपारी विश्रांती. शिरूर येथे लुंकड यांच्याकडून रात्रीचे भोजन व रात्रीचा मुक्काम.

२१ एप्रिल रोजी रांजणगाव मंदीर दर्शन, कोडापुरीला किसन चव्हाण परिवार यांच्यातर्फे भोजन व निवास.

२२ एप्रिल रोजी शिक्रापूर येथून कोरेगांव भिमा येथे ढाकलिया परिवारातर्फे भोजन, रात्री वाघोलीला अजित शेवाळे यांच्यातर्फे भोजन व मुक्काम.

२३ एप्रिल रोजी साकोरे यांच्याकडे दुपारचे जेवण व विश्रांती. तेथून धनकवडी मठाकडे प्रस्थान. नंतर वैभव जवाहिरे यांच्या निवासस्थानी भोजन व मुक्काम.

२४ एप्रिल रोजी श्रींना अभिषेक व दुपारी १२ ते ३ शंकर गीता पारायण (वैभव जवाहिरे यांच्या निवासस्थानी भोजन व मुक्काम) दुपारी महाप्रसाद.

या पायी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन शंकरलिला परिवाराचे सद्गुरू विजयनाथ केदारी महाराज आणि निलीमा केदारी यांनी केले आहे. माहितीसाठी संपर्क : केदारी (मोबाईल ९२२६९००००३), अमित थोरात (मोबाईल ९५११११५०४०), श्रीपाद तांबोळी, अहिल्यानगर. (मोबाईल ९३७०७४३५१५).

# 'क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले' द्विशताब्दी वर्षानिमित्त शिक्षणप्रेरक चित्ररथाचे अहिल्यानगरमध्ये उत्स्फूर्त स्वागत



नगर – क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी वर्षानिमित्त अखिल भारतीय समता परिषद संस्थापक अध्यक्ष नामदार छगनरावभुजबळ, खासदार समीर भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षणप्रेरक व समाजजागृतीचा संदेश देणारा चित्ररथ अहिल्यानगर शहरात दाखल झाला. पुणे येथील भिडेवाडा (मुलींची पहिली शाळा) याची आकर्षक प्रतिकृती या चित्ररथामध्ये साकारण्यात आली होती. त्याचबरोबर महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिम इंद्वारे त्यांच्या शिक्षणविषयक कार्याचे प्रभावी दर्शन घडविण्यात आले.

नाशिक येथून प्रारंभ झालेली ही राज्यव्यापी रथयात्रा संपूर्ण महाराष्ट्रभर शिक्षणाची जागृती करण्याच्या उद्देशाने काढण्यात आली आहे. अहिल्यानगरमध्ये या रथाचे आगमन होताच अखिल भारतीय समता परिषद महानगर अहिल्यानगरच्या वतीने उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. यावेळी महात्मा फुले, सावित्रीबाई फुले आणि शाहू महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

या स्वागत सोहळ्याप्रसंगी अखिल भारतीय समता परिषद महानगर अहिल्यानगरचे प्रदेश चिटणीस अंबादास गारुडकर, कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे, महानगर अध्यक्ष ब्रिजेश ताठे, कैलास फुलसौंदर, प्रा. शिवाजी विधाते, राम व्यवहारे यांच्यासह जिल्हा कार्यकारिणी सदस्य अनिल गाडीलकर, संघटक बबलू रासकर, संतोष हजारे, तालुकाध्यक्ष सोमनाथ घाडगे, नगर तालुका कार्याध्यक्ष युवराज हजारे, बाबासाहेब कांडेकर तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना अभिषेक चिपाडे म्हणाले की, महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी समाजातील वंचित, शोषित घटकांसाठी शिक्षणाची दारे खुली करून खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांती घडवून आणली. त्या काळात मुलींचे शिक्षण हे मोठे धाडस मानले जात असताना त्यांनी सर्व अडथळ्यांना सामोरे जात शिक्षणाचा दीप प्रज्वलित ठेवला. त्यांच्या या कार्यामुळेच आज समाजात समतेची बीजे रुजली असून शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तन शक्य झाले आहे.

अंबादास गारुडकर पुढे म्हणाले की, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे शिक्षणविचारच समाज परिवर्तनाची खरी क्रांती आहेत. छत्रपती शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला न्याय, समता आणि स्वाभिमानाचा मार्ग दाखविला. आजच्या पिढीने या महापुरुषांच्या विचारांचा वारसा जपून शिक्षणाचा प्रसार करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण हेच समाजातील विषमता दूर करण्याचे प्रभावी साधन असून प्रत्येकाने त्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.




नवी पेठ येथील फळ विक्रेते पप्पू पामनदास आहुजा यांनी अक्षय तृतीयेनिमित्त नगरकरांसाठी अस्सल रत्नागिरी आणि देवगड हापूससह विविध जातींचे आंबे परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आंब्यांची खरेदी करताना चोखंदळ ग्राहक वर्ग.

# अक्षय तृतीयेच्या मुहूर्ता निमित्त आंबा खरेदीवर 'पप्पू पामनदास आहुजा' कडून धमाका ऑफर

### रत्नागिरी-देवगड हापूससह सर्व जाती आता सर्वसामान्यांच्या बजेटमध्ये

नगर – नवी पेठ येथील फळ विक्रेते पप्पू पामनदास आहुजा यांनी अक्षय तृतीयेनिमित्त नगरकरांसाठी खास भेट आणली आहे. मुहूर्तावर अस्सल रत्नागिरी आणि देवगड हापूससह विविध जातींचे आंबे परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध करून देण्यात आले आहेत. यंदाच्या हंगामात ग्राहकांना उत्कृष्ट दर्जा मिळावा यासाठी थेट कोकणातील बागांमधून निवडक 'नंबर १ एक्सपोर्ट क्वॉलिटी' आंबे मागवण्यात आले आहेत. यात अस्सल रत्नागिरी हापूस, देवगड हापूस यांसह रसाळ पायरी, सुगंधी केशर, लालबाग आणि तोतापुरी अशा विविध जातींच्या आंब्यांची मोठी आवक झाली आहे.

याप्रसंगी माहिती देताना कैलास आहुजा म्हणाले की, अक्षय तृतीया हा आनंदाचा सण आहे. या दिवशी प्रत्येक कुटुंबाला आमरसाचा गोडवा चाखता यावा, यासाठी आम्ही पप्पू पामनदास अहुजा च्या माध्यमातून थेट बागायत दारांकडून माल आणला आहे. मध्यस्थांची साखळी टाळल्यामुळे आम्ही ग्राहकांना बाजारापेक्षा कमी किमतीत आणि उच्च गुणवत्तेचा आंबा उपलब्ध करून देत आहोत.

विक्री केंद्राचे अज्जू आहुजा यांनी सांगितले की, आमचा आंबा हा 'किंग ऑफ किंग' दर्जाचा असून तो नैसर्गिकरित्या पिकवलेला आहे. अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर आंबा खरेदीसाठी ग्राहकांची मोठी गर्दी होत असून, आम्ही ग्राहकांच्या खिशाचा विचार करून दरात मोठी सवलत दिली आहे. चव आणि शुद्धतेची खात्री हेच आमचे वैशिष्ट्य आहे. नवी पेठ, आधुनिक कुरियर समोर संपर्क : ९५५२६३३९५५ / ९८९००५७३५३ / ९०२८२४८९८७ अहिल्यानगर असलेल्या या केंद्रावर आंबा खरेदीसाठी भेट द्यावी.

# 'मेहेर स्कूल'मध्ये २० ते २९ एप्रिल दरम्यान मुलांसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन

नगर – हिंदसेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये २० ते २९ एप्रिल या कालावधीत ३ वर्ष ते १३ वर्षे वयोगटातील मुलांसाठी उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत मनोरंजन आणि खेळातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, शारीरिक व मानसिक विकास व्हावा. तसेच विद्यार्थ्यांचे कला गुण विकसित व्हावे. हस्तकला चित्रकला, विविध खेळ, योगा, इको फ्रेंडली ज्वेलरी बनवणे, फॅशन शो, अबॅकस यांचे प्रशिक्षण देणे.

फिटनेस की पाठशाळा या आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यासाठी विश्व मंगल आयुर्वेद चे संचालक डॉ.स्नेहलकुमार राहणे हे मुलांना आरोग्यविषयक माहिती देणार आहे. या शिबिरात नाडी परीक्षण कसे करावे, प्रथमोपचार तसेच निरोगी व सुदृढ आरोग्यासाठी योग्य आहाराचे नियोजन कसे करावे. हे विविध खेळांच्या व मनोरंजनाच्या माध्यमातून सांगितले जाईल.

व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळावी, चांगले ज्ञान, संस्कार मिळावे या उद्देशाने या समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती प्राचार्या प्रा.अनुरीता झगडे यांनी केले आहे. उन्हाळी शिबिराच्या प्रवेशासाठी नोंदणी आवश्यक आहे. ९९ रुपये नाममात्र शुल्क आकारले जाईल. अधिक माहितीसाठी संपर्क : मो.नं. ८९५६६२७९२५ साधावा.



मराठी भाषेची पालक संस्था असलेल्या पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विभागीय कार्यवाह पदी जयंत येलुलकर यांची एकमताने निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण आदी.

# महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेच्या विभागीय कार्यवाहपदी अहिल्यानगरचे जयंत येलुलकर यांची एकमताने निवड



नगर – मराठी भाषेची पालक संस्था असलेल्या पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या विभागीय कार्यवाह पदी अहिल्यानगरचे महाराष्ट्र साहित्य परिषदेचे जिल्हा प्रमुख जयंत येलुलकर यांची एकमताने निवड झाली. परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांच्या अध्यक्षतेखाली निवडून आलेल्या नूतन कार्यकारिणीच्या बैठकीत या पदाची घोषणा करण्यात आली.

श्री. येलुलकर यांनी म.सा.प च्या माध्यमातून जिल्ह्यातील साहित्य चळवळ गतिमान करण्यासाठी मोलाचे प्रयत्न केले असून त्यांच्या कार्यकाळात अहिल्यानगर येथे विभागीय साहित्य संमेलन, राज्य स्तरीय युवा साहित्य नाट्य संमेलन, बाल साहित्य संमेलनाचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले. येलुलकर संपादक असलेल्या म.सा.प सावेडी उपनगर शाखा व शांतिकुमार फिरोदिया मेमोरियल फाऊंडेशन यांच्या वतीने गेल्या दहा वर्षांपासून प्रकाशित करण्यात येणाऱ्या वारसा दिवाळी अंकास चार वेळेस राज्य पुरस्काराने गौरविण्यात आले. विविध उपक्रमांच्या माध्यमातून जिल्ह्यातील साहित्य चळवळ समृद्ध करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची दखल घेत येलुलकर यांना २०२५ साली महाराष्ट्र साहित्य परिषदेने प्रतिष्ठेच्या रत्नाकर कुलकर्णी स्मृती कार्यकर्ता पुरस्काराने गौरविण्यात आले होते.

यावेळी अध्यक्ष योगेश सोमण म्हणाले की, साहित्य क्षेत्रातील येलुलकर यांचे योगदान प्रशंसनीय असून महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या भविष्यातील अनेक योजना, उपक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यासाठी त्यांच्या अनुभवाचा, मनापासून काम करण्याच्या स्वभावाचा उपयोग होईल.त्यांच्या या पदाला ते नक्कीच न्याय देतील व संधीचे सोने करतील असा विश्वास वाटतो.

यावेळी प्रमुख कार्यवाह स्वाती महाळंक, कोषाध्यक्ष प्रदीप निफाडकर, कार्यवाह सुनील महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती.

# खिडकीचे गज कापून घरात घुसून सवा लाख रुपयांचा ऐवज पळविला

### केडगाव उपनगरातील काकडे मळा येथील घटना, सोन्याचे दागिने, रोकड लंपास

नगर – केडगाव परिसरातील नगर–पुणे महामार्गावर असलेल्या काकडे मळा भागात दोन अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री खिडकीचे गज कापून घरात प्रवेश करत रोख रकमेसह सोन्याचे दागिने असा एकूण १ लाख २२ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

याबाबत रामदास शंकर काकडे (वय ४९, रा. ज्ञानेश्वर हॉटेल मागे, काकडे मळा, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांचा बांधकाम व्यवसाय असून ते ज्ञानेश्वर हॉटेलच्या मागे कुटुंबासह राहतात. १५ एप्रिल रोजी रात्री सर्व कुटुंब जेवण करून झोपले होते. फिर्यादी, त्यांची पत्नी आणि आई घरासमोरील भागात झोपले होते, तर मुलगा आणि मुलगी घरात झोपलेले होते. पहाटे पावणे पाच वाजेच्या सुमारास मुलीला जाग आली असता, दोन अनोळखी व्यक्ती तोंडाला रुमाल बांधून घरातील सामान चोरत असल्याचे तिच्या निदर्शनास आले.

चोरट्यांनी घराच्या किचनमधील खिडकीचे गज कापून आत प्रवेश केला होता. घरातील बेडमधील लोखंडी कपाटाचे दरवाजे तोडून लॉकरमधील दीड तोळ्याची सोन्याची साखळी, सोन्याचे कानातील दागिने, पितळी मूर्ती आणि ४० हजार रुपयांची रोख रक्कम असा माल लंपास केला. या चोरीप्रकरणी रामदास काकडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून कोतवाली पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

भरवस्तीत झालेल्या या चोरीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांनी गस्त वाढवण्याची मागणी होत आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली दुकान मिळकत **श्री.संजयकुमार नंदलाल नवलाखा रा. मेन रोड श्रीरामपुर, ता. श्रीरामपुर, जि.अहिल्यानगर** यांच्या खरेदी मालकी वहिवाटीची व प्रत्यक्ष ताब्यात व कब्जात आहे. विद्यमान मालकांनी सदर दुकान मिळकत आमचे अशिलास कायमखुश खरेदीने विक्री करण्याचे ठरवले असून सदर मिळकतीच्या विक्रीच्या व्यवहारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध–निर्जोखमी व बोजारहीत असल्याची खात्री व भरवसा मिळकतीचे विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे. सदर मिळकतीचा ठरल्याप्रमाणे आमचे अशिल लवकरच व्यवहार पूर्ण करणार आहेत. सबब सदर दुकान मिळकतीवर कोणाचाही गहाण, दान,बक्षिस,लिज,लिन, करार–मदार, चालू वाद, कोर्ट केस, साठेखत, कुलमुखत्यारपत्र किंवा अन्य कोणत्याही प्रकारे क्लेम, हक्क किंवा बोजा असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ८ दिवसांचे आत सर्व मूळ कागदोपत्री पुराव्यानिशी खाली दिलेल्या पत्त्यावर आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही पूर्णत : निर्वेध व निजोखमी व बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन** :–डि. //अहिल्यानगर सब डि.नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालीका हद्दीतील शहरनगर येथील दाळमंडई भागातील दुकान मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–सिटी सर्व्हे नं.१३१० चे एकुण क्षेत्र १३८.८० चौ.मी. या एकुण क्षेत्रफळावर बांधण्यात आलेल्या सुखचेंबर्स या इमारती मधील तळमजल्यावरील दुकान नं.३ चे क्षेत्र ३५.५८ चौ.मी. ही संपुर्ण मिळकत.

**येणेप्रमाणे चर्तुःसिमा पुढीलप्रमाणे :–**

पुर्व – रस्ता, दक्षिण – दुकान नं.४ आणि वर जाणारा जिना

पश्चिम – गल्ली (रस्ता), उत्तर दुकान नं. १ व २

येणेप्रमाणे दुकान मिळकत व त्यामधील तदंगभुत वस्तु, वागणुकीच्या, वहिवाटीच्या हक्कांसह काहीही एक राखून न ठेविता असे.

दि.१७/०४/२०२६
अहिल्यानगर

**ॲड.प्रदीप एम.भंडारी**
बी/१ , अमेय चेबर्स,कोर्ट गल्ली ,
अहिल्यानगर, मो.नं : ९८२२३९९७०५

